**सुविचार**
जीवन एक नाटक है, यदि हम इसके कथानक को समझ लें तो सदैव प्रसन्न रह सकते हैं ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेव वृत्तपत्र
दैनिक
# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦ /बुधवार दि. १३ नोव्हेंबर २०२४✦वर्ष ५३ वे✦अंक- ३२ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## मोदींना नोबेल शांतता पुरस्कार द्या

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांची धोरणे तसेच निर्णयांमुळे जागतिक स्तरावर ओळख निर्माण केली आहे. मोदी जगातील सर्वच राजकीय बाजूंच्या घटकांशी चर्चा करण्यास सक्षम आहे. या प्रयत्नांसाठी त्यांना नोबेल शांतता पुरस्कार द्यायला हवा, अशी मागणी दिग्गज गुंतवणूक तज्ज्ञ मार्क मोबियस यांनी केली आहे.

८६ वर्षांचे दिग्गज गुंतवणूकदार मोबियस यांनी मुलाखतीमध्ये मोदींच्या कार्यांची जोरदार प्रशंसा केली आहे. पश्चिम आशियातील संघर्ष आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे जगात अशांतता आहे. या काळात पंतप्रधान मोदी शांतीदूत ठरु शकतात, असे भाकित त्यांनी केले. मोबीयस यांनी पुढे सांगितले की, पंतप्रधान मोदी एक महान नेता आणि चांगले व्यक्ती आहे. आंतरराष्ट्रीय



पातळीवर त्यांचे महत्त्व वेगाने वाढत आहे. त्यांच्याकडे सर्व प्रकाराच्या राजकीय व्यक्तींशी चर्चा करण्याची क्षमता आहे.

आगामी काळात पंतप्रधान मोदी महत्त्वाचे शांतीदूत ठरु शकतात. नोबेल शांतता पुरस्काराबाबत बोलताना ते म्हणाले की, पंतप्रधान मोदी या प्रतिष्ठेच्या जागतिक पुरस्काराचे दावेदार आहे. भारताकडे सर्व देशांमध्ये अलिप्त देश म्हणून राहण्याची क्षमता आहे. भारताची ही क्षमता त्यांना जागतिक स्तरावरील शांततेसाठी मध्यस्थ बनण्यात उपयोगी ठरु शकते. संपूर्ण जगात मध्यस्थीची भूमिका बजावण्यासाठी मोदी महत्त्वाचे व्यक्ती आहेत.

जागतिक शांततेसाठी मोदींचे प्रयत्न

रशिया आणि युक्रेनमधील संघर्ष शांततामय मार्गांनी समाप्त व्हावा ही भूमिका पंतप्रधान मोदींनी मांडली आहे. पंतप्रधान मोदींनी ऑगस्ट महिन्यात युक्रेनचा दौरा केला होता. युद्धग्रस्त भागात शांततेला चालना देण्यासाठी भारत **(पान ५ वर)**

## महायुतीत राहून विरोधात काम करु नका: मुख्यमंत्री

अमरावती : अमरावतीमधल्या प्रचारसभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी खासदार नवनीत राणा आणि रवी राणा यांच्यावर निशाणा साधला आहे. ऐन निवडणुकीत राणा दाम्पत्य आणि विरोधकांमधील वाद उफाळून आल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राणा दाम्पत्याला इशारा दिला आहे. महायुतीत राहून महायुतीविरोधात काम करणा-यांची नोंद घेतली जाणार असल्याचेही एकनाथ शिंदेंनी म्हटले.

अमरावती भाजप कार्यालयात काही दिवसांपूर्वी बडनेराचे उमेदवार रवी राणा यांची बैठक झाली. त्यामध्ये रवी राणा यांनी अमरावतीची एक जागा कमी झाली तरी चालेल पण कमळ



निवडून आले पाहिजे, असे वक्तव्य केले होते. राणांच्या वक्तव्यानंतर अजित पवारांकडून त्यांची कानउघडणी करण्यात आली. राणा म्हणजे विनाशकाले विपरीत बुद्धी सारखे वागत आहेत. त्यांच्याबद्दल न बोललेले बरे. त्यांच्या अशा बोलण्यानेच लोकसभेला त्यांच्या पत्नीचा पराभव झाला **(पान ५ वर)**

## किरकोळ महागाई आरबीआयच्या हाताबाहेर गेली

मुंबई : अमेरिकेने नवीन सरकार येण्याची चाहूल लागताच व्याजदर कमी केला आहे. यामुळे भारततही आरबीआय व्याजदर कमी करेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. परंतु, ऑक्टोबर महिन्यातील किरकोळ महागाई दराचा आकडा आला असून आता व्याज दर कपातीची शक्यता धुसर बनली आहे.

महागाई आता आरबीआयच्या हाताबाहेर गेली आहे. ग्राहक मुल्य निर्देशांकावर आधारित महागाईने ऑक्टोबरमध्ये ६.२१ टक्क्यांची पातळी गाठली आहे. सप्टेंबरमध्ये हाच महागाई दर ५.४९% होता. यात ०.७२ टक्क्याची वाढ झाली आहे. अशाप्रकारे ही महागाई आरबीआयच्या सहा टक्क्यांच्या समाधानकारक पातळीच्या वर गेली आहे. केंद्र सरकारने आरबीआयवर ही किरकोळ महागाई चार



टक्क्यांपर्यंत आणण्याची जबाबदारी दिली होती. परंतू तसे करण्यात आरबीआय अपयशी ठरली आहे.

गेल्याच महिन्यात आरबीआयने रेपो रेच ६.५ टक्क्यांवर स्थिर ठेवला होता. अमेरिकेमुळे हा दार कमी करेल अशी अपेक्षा होती, परंतू महागाई दर पाहता रेपो रेट कमी होण्याची शक्यता उरलेली नाही.

खाद्यपदार्थांची महागाई १०.८७ टक्क्यांवर

ऑक्टोबरमध्ये खाद्यपदार्थांची महागाई वाढून १०.८७ टक्क्यांवर पोहोचली आहे. सप्टेंबरमध्ये ती ९.२४ टक्के होती. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये ही महागाई ६.६१ टक्क्यांवर होती. तर किरकोळ महागाई याच महिन्यात गेल्या वर्षी ४.८७ टक्क्यांवर होती. यामुळे या दिवाळीच्या महिन्यात महागाई कोणत्या पातळीवर गेली आहे याचा अंदाज येतो.

कांदा आणि युद्ध आणखी भडकवणार **(पान ५ वर)**

## एसटीच्या बसेस इलेक्शन मोडवर

मुंबई : राज्यात एकाच टप्प्यात होणारी मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी निवडणूक आयोगही सज्ज आहे. मतदानाचे यंत्र, साहित्य आणि मतदान पथकांना मतदान केंद्रापर्यंत नेऊन सोडण्याची आणि तिथून मतमोजणीसाठी नेण्याची जबाबदारी राज्य परिवहन (एसटी) महामंडळावर सोपविण्यात आली आहे.

दरम्यान, महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. मतदानाची तारीख जसजशी जवळ येतेय, तसतशी राजकीय प्रचार सभांची तोफ जोमाने धडाडतेय. आपले आमदार निवडून देण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे.

निवडणूक आयोगाने १९ नोव्हेंबर आणि २० नोव्हेंबर अशा २ दिवसांसाठी एसटीकडे तब्बल ९ हजार बसची मागणी केली. त्यापैकी १९ नोव्हेंबरला मतदान केंद्रावर साहित्य घेऊन जाण्यासाठी ८ हजार ९७८ बस वापरल्या जाणार आहेत आणि २० नोव्हेंबरला मतदान झाल्यानंतर यंत्र मतमोजणीच्या ठिकाणी नेण्यासाठी तेवढ्याच गाड्या वापरात असतील. तसेच २४५ बस पोलिस प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव. प्रत्येक सजग भारतीय नागरिकाने देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आपले बहुमूल्य मत द्यायलाच हवे. अर्थात २० नोव्हेंबरला राज्यात मोठ्या संख्येने नागरिक घराबाहेर पडतील. अशात हजारोंच्या संख्येने बस निवडणूक प्रक्रियेसाठी **(पान ७ वर)**

## मल्लिकार्जुन खरगे यांची आज सभा

लातूरः प्रतिनिधी- विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला आहे. निवडणूक प्रचारासाठी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे आज (दि.१३) लातूर शहरात येणार आहेत. लातूर शहर विधानसभा मतदारसंघ आणि लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस-महाविकास आघाडीचे लातूर शहर विधानसभा मतदार संघाचे उमेदवार माजी मंत्री अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामिण धिरज विलासराव देशमुख, अहमदपूर मतदारसंघाचे विनायकराव **(पान ५ वर)**

## हक्काचा साखर कारखाना लवकरच : चेअरमन राजेश कराड





लातूर दि.१२ - शेतकऱ्याच्या मागणीमुळेच श्रीसंत गोपाळबुवा महाराज शुगर इंडस्ट्रीजच्या माध्यमातून साखर कारखान्याची उभारणी केली असून हा कारखाना स्वाभिमानी शेतकऱ्यांच्या हक्काचा कारखाना आहे. येत्या डिसेंबर अखेर प्रत्यक्ष गाळपास सुरुवात होईल आणि गरजेनुसार टप्प्याटप्प्याने गाळप क्षमता वाढविण्यात येईल असे कारखान्याचे चेअरमन राजेश कराड यांनी रोलर पूजन कार्यक्रमात बोलून दाखविले.

लातूर तालुक्यातील दिंडेगाव रोडवर मौजे रामेश्वर परिसरात उभारलेल्या श्री संत गोपाळबुवा महाराज शुगर अँड फूड इंडस्ट्रीजच्या साखर कारखान्याचा रोलर पूजनाचा कार्यक्रम हभप श्री बाबा महाराज बोराडे काटगावकर, हभप श्री नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, ह भ प श्री लालासाहेब पवार यांच्या शुभहस्ते मंगळवारी सकाळी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. याप्रसंगी जेष्ठ मार्गदर्शक अँड बळवंतराव जाधव, कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तुळशीरामअण्णा कराड, प्रगतशील शेतकरी काशीरामनाना कराड, चेअरमन राजेश कराड, कार्यकारी संचालक थोरबोले, ऋषिकेशदादा कराड, भागवत सोट, पद्माकर चिंचोलकर, महेंद्र गोडभरले, अनिल भिसे, दशरथ सरवदे, बन्सी भिसे, गोविंद नरहरे, हनुमंतबापू **(पान ५ वर)**

## कंधार-लोहा मतदारसंघात चुरशीची लढत

कंधार : प्रतिनिधी - कंधार लोहा विधानसभा मतदारसंघात महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रताप पाटील चिखलीकर, शेकापचे आशाताई शामसुंदर शिंदे, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे एकनाथ पवार, आरक्षणवादी आघाडीचे चंद्रसेन सुरनर व मनोहर धोंडेसह एकूण १४ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. महायुती, महाविकास आघाडी व ओबीसी आघाडी यामध्ये जोरदार लढत आहे. कंधार लोहा विधानसभा मतदार संघात मोठी चुरशीची लढत होत असल्याने संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

या मतदारसंघात मागील निवडणुकीच्या उलट परिस्थिती निर्माण झाली असून मात्र खरी लढत प्रताप पाटील चिखलीकर आणि आशाताई शिंदे या बहिण भावासह एकनाथ पवार यांच्यात होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. ओबीसी नेते चंद्रसेन पाटील सुरनर, मनोहर धोंडे, शिवा नरंगले या तीन उमेदवारांमुळे ओबीसी समाजातील मतदाराचे विभाजन **(पान ५ वर)**



## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे डॉ. अर्चनाताई पाटील यांना आशीर्वाद

लातूर/प्रतिनिधी:केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी लातूर शहर मतदारसंघातील भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना विजयासाठी शुभेच्छा व आशीर्वाद दिले.सुखी व समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर यांच्या पाठीशी उभे रहा,असे आवाहनही त्यांनी मतदारांना केले.

देवणी येथील सभेला जाण्यासाठी नितीन गडकरी लातूर विमानतळावर आले होते. लातूर मतदारसंघाच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी त्यांची यावेळी भेट घेतली. यावेळी गडकरी यांनी ताईंना आशीर्वाद देत मतदारसंघातील प्रचार मोहिमे संदर्भात माहिती जाणून घेतली. उर्वरित कालावधीत प्रचाराची दिशा कशी असावी ? या संदर्भातही त्यांनी मार्गदर्शन केले.

माध्यमांशी संवाद साधताना नितीन गडकरी म्हणाले की,सुखी व समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी महायुतीचे सरकार काम करत आहे.निवडणुकीनंतरही पुन्हा महायुतीचे **(पान ५ वर)**

## मतदारांचा उत्साहच निलंग्याचा बदल घडविणार



निलंगा : मतदारसंघात बळावलेला भ्रष्टाचार,कमिशनखोरी , दडपशाही संपुष्टात आणुन सर्वसामान्यजनतेचा आवाज विधानसभेत पाठवण्याचा चंग आता मतदारांनी बांधला आहे.मतदारसंघात पहावयास मिळत असलेला मतदारांचा उत्साहच निलंगा मतदारसंघात बदल घडविणारं असा विश्वास माजी मंत्री अमित देशमुख यांनी व्यक्त केला.

ते काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभय साळुंके यांच्या प्रचारार्थ आयोजित अंबुलगा (बु) येथील सभेत बोलत होते.

व्यासपीठावर काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभय साळुंके , माजी खासदार सुधाकर श्रृंगारे, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर, तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, माजी नगराध्यक्ष हमीद शेख, माजी सभापती अजित माने, ड . नारायण सोमवंशी, शेतकरी संघटनेचे राजकुमार सस्तापुरे ,अंबादास जाधव, कुमार पाटील,डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ अरविंद भातांब्रे , पंकज शेळके , चक्रधर शेळके, महिला तालुका अध्यक्षा आरती बालाजी भंडारे , राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष सुधीर मसलगे,सरपंच स्वाती किरण शिंदे , उपसरपंच जगदीश सगर ,गुंडेराव बिरादार, जगदीश सगर,सुभाष शिंदे, महावीर काकडे आदींची उपस्थिती होती

पुढे बोलताना अमित देशमुख म्हणाले की , महायुतीच्या कारभाराला जनता कंटाळली असल्याचे धोतक महाविकास आघाडीच्या होणाऱ्या सभेवरुन जाणवते.डॉ शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या निष्ठावंत काँग्रेसचा वारसा चालवायचा आहे.त्याची जबाबदारी आता अशोकराव पाटील यांच्याबरोबरच अभय साळुंके यांचीही आहे. सामान्य माणसांचा आवाज विधानसभेत बुलंद करण्यासाठी अभय साळुंके यांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

दलित म्हणून माझी पिळवणूक.... श्रृंगारे **(पान ५ वर)**

## लातूरच्या सर्वांगीण विकासासाठी १०० टक्के योगदान देणार : डॉ.अर्चनाताई पाटील चाकुरकर




लातूर/प्रतिनिधी:लातूरचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर इथे नोकऱ्यांची संधी उपलब्ध असणे गरजेचे आहे.येथील ज्ञानाचा उपयोग लातूरकरांना झाला पाहिजे.या नोकऱ्या उपलब्ध होण्यासाठी आयटी क्षेत्रातील कंपन्या लातूरला येणे आवश्यक असून त्यासाठी १०० टक्के योगदान देणार असल्याचे प्रतिपादन भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकुरकर यांनी केले.

सांदिपनी टेक्निकल कॅम्पस व एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयात आयोजित विद्यार्थ्यी संवाद बैठकीत डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर बोलत होत्या.

एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयात भाजप युवा नेते ऋषीकेशद कराड,युवामोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर,हैबतपूरकर महाराज, प्राचार्या कुलकर्णी यांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर म्हणाल्या की,लातुरने शैक्षणिकक पॅटर्न निर्माण केला परंतू नोकऱ्यांच्या संधी येथे उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. राजकीय इच्छाशक्तीच्या अभावाने लातूर मागे राहिले. त्यामुळे येथील युवक मुंबई,पुणे, बेंगलोर आदी ठिकाणी नोकरीसाठी जातात.यापुढे असे होणार नाही.लातुरात जसा शैक्षणिक पॅटर्न निर्माण झाला तसेच नोकऱ्यांसाठी लातूरमध्ये संधी उपलब्ध करुन देण्याचे काम आम्ही पुर्ण शक्तीने करु,असे ताई म्हणाल्या.

युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले की,येथील राज्यकर्ते लातुरात सुरक्षित वातावरण देऊ शकले नाहीत.गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.यावर अंकुश ठेवण्यास स्थानिक आमदार कमी पडले.त्यामुळे विकासाची दृष्टी असलेल्या भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकुरकर यांना विधानसभेत जाण्याची संधी द्यावी.लातुरात परिर्वतन होणार आहे.त्यात तरुणांनी आपला वाटा उचलून भाजपाला सहकार्य करावे,असे आवाहन कव्हेकर यांनी केले. ऋषीकेश कराड यांनी लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे १५ वर्षांपासून **(पान ५ वर)**

## संभाजीरावाना आमदार करा आम्ही मंत्री करू

देवणी/ प्रतिनिधी:आ. संभाजीराव पाटील निलंगेकर हे कार्यसम्राट आमदार आहेत. ते युवा असून त्यांच्याकडे काम करण्याची अफाट शक्ती आहे. एक प्रभावी आमदार अशी त्यांची ओळख आहे. त्यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करत आमदार करा. निवडणुकी नंतर केवळ आमदार नाही तर मंत्री म्हणून ते काम करतील. संभाजीरावांना मंत्रिपद मिळण्याची हमी मी घेतो,असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. मतदारसंघातील रेल्वेमार्गासाठी आपण आ.निलंगेकरांच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

निलंगा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार माजीमंत्री आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या प्रचारार्थ देवणी येथे आयोजित जन स्वाभिमान सभेत गडकरी बोलत होते.

या सभेस आ.शरणू सलगर, . माजी खासदार रुपाताई पाटील निलंगेकर,व सुनिल गायकवाड, वीरुपाक्ष महाराज मुखेडकर, माजी आमदार गोविंद केंद्रे व



प्रकाश खंड्रे,प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण,भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीप देशमुख,तालुकाध्यक्ष काशिनाथ गरीबे,मंगेश पाटील, कुमोद लोभे,माजी जि.प.सदस्य रामचंद्र तिरुके,संजय दोरवे, गोविंद चिलकुरे,प्रशांत पाटील, शिवानंद हैबदपुरे,भगवान पाटील तळेगांवकर,शिवसेना उप जिल्हा प्रमुख सुधीर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना नितीन गडकरी म्हणाले की,काँग्रेसने स्वातंत्र्यानंतर रशियाची धोरणे स्वीकारली.त्या धोरणांचे परिणाम काय झाले ? हे आज आपण पाहत आहोत. सरकारी विमान कंपन्या तोट्यात गेल्या. सोन्याच्या खाणीही तोट्यात गेल्या.याशिवाय जिथे काँग्रेसने हात घातला तिथे नुकसानच झाले.त्याऐवजी काँग्रेसने गावाच्या विकासाला गती दिली असती तर हे चित्र दिसले नसते. लोकशाहीत बदल घडविण्यासाठी योग्य धोरण आणि नीतीची गरज असते, असे गडकरी म्हणाले.

त्यांनी सांगितले की, केंद्र आणि राज्य सरकारकडून गरीब कल्याणाच्या योजना राबविल्या जात आहेत.सरकारने प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून गावे एकमेकांशी जोडली.सरकारची ही प्राथमिकता आहे.काँग्रेसला ६० वर्षात जे करता आले नाही ते आम्ही १० वर्षात करून दाखवले.भारताला विश्वगुरू बनवणे हे आपले ध्येय आहे. भ्रष्टाचार मुक्त भारत,ग्रामीण व कृषीमध्ये अग्रेसर भारत निर्माण करण्यासाठी आम्ही काम करत आहोत.देशाला सुखी,समृद्ध व संपन्न बनवायचे असेल,राज्याला सुखी ठेवायचे असेल,राज्यातील गरिबी व जातीयता दूर करायची असेल तर योग्य हातात सत्ता देण्याची गरज असल्याचेही गडकरी म्हणाले.

नितीन गडकरी यांनी सांगितले की,संविधानाची मूलतत्त्वे **(पान ५ वर)**

# नांदेड दक्षिण विधानसभा निवडणुकीसाठी मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण संपन्न

## ११०० प्रशिक्षणार्थ्यांनी घेतले प्रशिक्षण

नांदेड (प्रतिनीधी): विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेतील शिस्तबद्धता आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने मतदान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण नागार्जुना पब्लिक स्कुल,कौठा, नांदेड येथे आज १२ नोव्हेंबर रोजी संपन्न झाले.

आजच्या प्रशिक्षणामध्ये जवळपास ११०० कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेतले. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या प्रशिक्षणात मतदान प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण घटकांवर तसेच ईव्हीएम मशीन (इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन) व वीव्हीपॅटच्या (ततझढ) वापरावर विशेष प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी डॉ खल्लाळ यांनी प्रथम क्षेत्रिय अधिकारी यांना सूचना देवून मार्गदर्शन केले.

त्यानंतर मतदान अधिकारी व कर्मचारी यांना निवडणूक प्रक्रियेतील संपूर्ण माहिती देणाऱ्या लोकविधान पोर्टलचे महत्त्व विशद करुन या पोर्टलचा वापर करण्याचे आवाहन केले. प्रशिक्षण स्थळी जागोजागी या पोर्टलचा वापर करण्यासाठी बारकोड लावण्यात आले होते. यावेळी प्रशिक्षणपीठावर मनपा उपायुक्त सुप्रिया टवलारे, सहायक आयुक्त मनिषा नरसाळे, तहसिलदार प्रविण पांडे,नायब तहसीलदार नितेशकुमार बोलोलु, संजय नागमवाड यांची उपस्थिती होती.

मुख्य प्रशिक्षक संघरत्न सोनसळे यांनी प्रशिक्षण देतांना मतदान प्रक्रियेतील जबाबदाऱ्या, पारदर्शकता, मतदारांची ओळख तपासणी, गुप्त मतदान प्रक्रिया, मतपेटी हाताळणी, तसेच ईव्हीएम मशीनच्या वापराबाबत ईव्हीएम आणि वीव्हीपॅटची कार्यप्रणाली स्पष्ट करून कर्मचाऱ्यांना मशीनच्या सुसज्जतेबाबत दक्ष राहण्याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी मतदान केंद्रांवरील शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक तंत्रांचा वापर कसा करावा ,याचेही मार्गदर्शन केले.मतदानाच्या प्रक्रियेत काटेकोर पालन करणे कसे महत्त्वाचे आहे यावर त्यानी भर दिला. ईव्हीएम मशीनची सुरक्षित हाताळणी,



मशीन प्रमाणपत्र तपासणे, मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यावर मतपेट्यांचे सुरक्षित हस्तांतरण यासारख्या विषयांवर त्यांनी प्रशिक्षण दिले. तसेच मतदान केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित केले.

मतपेटी आणि ईव्हीएमची सुरक्षित हाताळणी, मतमोजणी प्रक्रिया आणि मतदानाच्या वेळी शक्य असलेल्या तांत्रिक अडचणींवर मार्गदर्शन केले. ईव्हीएम आणि वीव्हीपॅट वापराचे तंत्र आणि त्यातील तांत्रिक बाबींसाठी कर्मचाऱ्यांना विशेष निर्देश दिले, ज्यामुळे मतदानाच्या प्रक्रियेत सुलभता निर्माण होईल. यावेळी काही मतदान अधिकारी व कर्मचारी यांनी आपले प्रश्न उपस्थित केल्यामुळे प्रत्यक्ष मतदान केंद्रावर कोणत्या समस्या निर्माण होतात आणि उपाय कोणते, हे सर्वांना समजले. प्रशिक्षण दरम्यान उपस्थित कर्मचाऱ्यांनी मतदान प्रक्रियेत येणाऱ्या संभाव्य अडचणींबाबत प्रश्न विचारले आणि त्यांना तज्ञांकडून समाधानकारक उत्तरे देण्यात आली. या प्रशिक्षणमुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला असून, ते आता आगामी निवडणुकीसाठी अधिक सज्ज झाले आहेत. यानंतर एकूण १५ विविध कक्षामध्ये प्रत्येकी ४० जणांस तंत्रज्ञानाचा अचूक वापर करुन प्रत्यक्ष कृतीतून प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण कंटाळवाणे होवू नये प्रशिक्षणार्थांनी सुध्दा सक्रीय सहभाग घेऊन या आधुनिक तंत्राचा वापर करण्यासाठी पुढाकार घेतला. ही प्रक्रिया राबविण्यासाठी शाळेचे संचालक केशव गड्डम यांनी आपल्या संपूर्ण तंत्रज्ञ टिमसह तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी भरीव सहकार्य केले. तंत्रज्ञ म्हणून सुशील माळवतकर, मोईन खान यांनी कार्य केले. प्रत्यक्ष मतदान यंत्र कसे हाताळावे याचे प्रात्यक्षिक मास्टर ट्रेनर मोहन कलंबरकर, धर्मेंद्रसिंग शिलेदार, सचिन राका, गजानन मस्के यांनी दाखवले.या प्रशिक्षणाचे सुत्रसंचालन व आभार संजय विश्वनाथ भालके यांनी केले. हे प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी पेशकार राजकुमार कोटुरवार,नियोजन सहाय्यक बी.एस.पांडे,मकरंद भालेराव, राजेश कुलकर्णी, एस.व्ही.भालके प्रा. डॉ.घनश्याम येळने,डॉ सचिन नरंगले, बालासाहेब कच्छवे, हनुमंत राठोड,जमील शेखसह सर्व नांदेड तहसील कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# येरोळ व परिसरात ऊस लागवडीची लगबग, जानेवारी अखेर पर्यंत ऊस लागवड राहणार सुरू



**प्रशांत तांबोळकर**

शिरूरअंनतपाळ : येरोळ व परिसरातील गावामध्ये गेल्या महिणाभरापासुन नवीन ऊस लागवडीला सुरवात झाली आहे. काही शेतकरी जुने पारंपारिक ऊस लागवड करत आहेत तर कांही शेतकरी ऊसाची नवीन सुधारीत रोपे आणून त्याची लागवड करत असल्याचे दिसुन येत आहे.

पाण्याची टंचाई लक्षात घेऊन गेल्यावर्षी अनेक शेतकऱ्यांनी ऊसाचे क्षेत्र कमी केले होते. परंतु यावर्षी चांगला पाऊस झाल्याने व परिसरातील तलाव विहीर बोअरला मुबलक पाणी साठा असल्याने अनेक शेतकरी सोयाबीनच्या रिकाम्या झालेल्या रानावर मशागत करुन नव्याने ऊस लागवड करण्याकडे कल वाढला आहे. चांगल्या व बारा महिणे वय झालेल्या ऊसाचे बेणे व एक डोळा पदत्तीचे रोप बियाणे विविध नामवंत नर्सरीमधून मागऊन शेतकऱ्यांनी नवीन ऊस लागवडीला सुरवात केलेली आहे. साधारणपणे एक रोप दोन रूपये तीस पैशे तर सुधारित वाण तीन रुपये पंचव्वीस पैशाला मिळत असुन अनेक शेतकरी शिराळा, कोल्हापुर, पुणे, आष्टी अहमदनगर, सांगली सातारा येथील नावाजलेल्या नर्सरीमध्ये ऊस रोपे बुंकिंग करुन मागऊन घेत आहेत.

येरोळ व परिसरात अंदाजे साडेचार ते पाच फूट सरी पाडण्याची पध्दत रूढ झाली आहे. बेणे लागवडीसाठी शेतकरी एक डोळा, दोन डोळा व तीन डोळा लागवडीची पध्दत अवलंबीत आहेत. तर दोन ऊस लागवडीतील अंतर दिड फुट ठेवल्याने अधिक फुटवा व अधिक उत्पादन होत असल्याचे येरोळ येथील प्रगतशिल ऊस उत्पादक शेतकरी उद्धव गंभीरे पाटील यांनी सांगितले.

साधारणपणे ऊसाचे बेणे तीन हजार पाचशे ते चार हजार रुपये प्रतीटन प्रमाणे विक्री होत असुन शेतकरी को.८६०३२, १५०१२, १०००१, ८०००५ या वाणाची अधिक ऊस लागवड होत असल्याचे दिसुन येत असुन गेल्यावर्षी आलेल्या नवीन वाण १५०१२ या ऊस बेण्याला अधिक मागणी असल्याचे दिसुन येत आहे. एकंदरित शेतकरी नोव्हेंबर ते जानेवारी अखेरपर्यंत नवीन ऊसाची लागवड करणार असल्याचे कृषी साहाय्यक श्रीमती एम.ओ.मोदी व तालुका कृषी अधिकारी लक्ष्मण खताळ यांनी सांगितले.

# नांदेड शहराला प्रशासनाने घातली साद महावीर चौकात कार्यक्रमाचे आयोजन

नांदेड(प्रतिनीधी ): नांदेड जिल्ह्यामध्ये गेल्या लोकसभा निवडणुकीत केवळ ६१ टक्के मतदान झाले होते. यावेळी ही टक्केवारी मोठ्या प्रमाणात वाढली पाहीजे यासाठी प्रशासन जोमाने कामाला लागले असून सर्वच स्तरातून प्रशासनाला प्रतिसाद मिळत आहे. आज महावीर चौकातील स्वीप अंतर्गत जाहीर कार्यक्रमामध्ये निवडणूक निरीक्षकांसह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. नांदेडकरांनी लोकशाहीच्या या पर्वात आपली जबाबदारी बहुसंख्येने पूर्ण करण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.

आज दि. ११ नोव्हेंबर रोजी ८७-नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील मतदान जनजागृती विशेष अभियान राबविण्यासाठी महावीर चौकात मनोरंजनासह प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी निवडणूक निरीक्षक श्रीमती बी. बालामाया देवी, श्रीमती पल्लवी



आकृती, कालुराम रावत , शैलेंद्र कुमार, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, नांदेड वाघाळा शहर महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, श्रीमती अनुष्का शर्मा, मनपा अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, मनपा उपायुक्त अजितपालसिंघ संधु, उपायुक्त संजय जाधव, सुप्रिया टवलारे, सहायक आयुक्त मिर्झा बेग, गुलाम सादिक यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी यावेळी उपस्थित सर्व नागरिकांना निष्पक्षपणे व कुठल्याही प्रलोभणाला बळी न पडता मतदान करण्याची शपथ दिली. याप्रसंगी भोकर येथील स्वीप कक्षाचे अधिकारी श्रीमती सुमन गोणारकर आणि सुधांशु कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार राजा आता तरी तू जागा हो! कणखर लोकशाहीचा तू मजबूत धागा हो! या आशयाचे पथनाट्याचे सादरीकरण करीत मतदार राजाला मतदान करण्याचे राष्ट्रीय कर्तव्य पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले. या मतदारसंघातील कार्यक्रमांमध्ये मान्यवरांच्या हस्ते केंद्र सरकारकडून आलेल्या केंद्रिय सुचना कार्यालयाच्या क्षेत्रीय प्रचार कार्यालयामार्फत जिल्ह्यात सुरु झालेल्या चलचित्र रथाचे उद्धाटन करण्यात आले. या रथाद्वारे मतदार संघातील शहरी आणि ग्रामीण भागात मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात येणार आहे. जेणेकरून जास्तीत जास्त मतदान होऊन लोकशाही बळकट होईल. यानिमित्त स्वीप कक्षाद्वारे सेल्फी पॉईंट उभा करण्यात आला होता यामध्ये महाविद्यालयातील तरुण मतदारांनी आणि इतर सामान्य नागरिकांनी सेल्फी काढून आपला सहभाग नोंदवला. काश्मीरसारख्या दुर्गम भागात आपल्यापेक्षा अधिक मतदान होते. यावेळी प्रत्येक नांदेडकरांनी मतदान करावे. आपले प्रत्येक मत हे आपल्या देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी महत्त्वाचे आहे, असे मत जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी व्यक्त केले.

## धिरज देशमुखांना महाविद्यालयीन प्राध्यापक संघटनेचा जाहीर पाठिंबा

लातूर (प्रतिनिधी) - लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार धिरज विलासराव देशमुख यांना लातूर जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक संघटनेने पाठिंबा जाहीर केला आहे. यामुळे महाविकास आघाडीसह देशमुख यांची ताकत वाढली आहे. लातूर जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक संघटनेने प्रसिद्धीपत्रक जाहीर करत आपला पाठिंबा दर्शवला.

लातूर जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक संघटनेने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, धिरज देशमुख यांच्या कार्याचा व महाविकास आघाडीने जुनी पेंशन योजना लागु करण्याचे आश्र्वासन दिले आहे. यामुळे तसेच धिरज देशमुख हे लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसघातील सर्व सामान्याचे प्रश्र्न विधीमंडळ सभागृहात वेळोवेळी मांडून मतदारसंघासाठी जास्तीत जास्त निधी खेचून आणतात. त्यांनी मतदार संघाचा विकास केला आहे.

# १९ व २० नोव्हेंबर रोजी वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या राजकीय जाहिरातींचे प्रमाणीकरण बंधनकारक

लातूर / प्रतिनिधी- सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार निवडणूक आयोगाने राजकीय प्रचार जाहिरातींबाबत नियमावली ठरवून दिली आहे. यानुसार वृत्तपत्रात मतदानाच्या एक दिवस अगोदर आणि मतदानादिवशी प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचे पूर्व-प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समितीकडून (एमसीएमसी) पूर्व प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे.

निवडणूक काळात दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क, केबल वृत्तवाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या राजकीय जाहिराती, बल्क एसएमएस, व्हाईस मेसेजेस, सोशल मीडिया इंटरनेट संकेतस्थळे यावर दर्शविण्याच्या जाहिरातींचे पूर्व-प्रमाणीकरण करणेही आवश्यक आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राजकीय जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण करण्यासाठी लातूर जिल्हास्तरावर माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समिती (एमसीएमसी) कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. समिती कक्ष बार्शी रोडवरील नवीन जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर कक्ष क्र. २१० येथे कार्यान्वित करण्यात आला आहे. उमेदवार किंवा प्रतिनिधींनी जाहिरात प्रसारित होण्याच्या किमान तीन दिवस अगोदर प्रमाणिकरणासाठी विहित नमुन्यातील अर्ज समितीकडे सादर करावा. विहित नमुना एमसीएमसी कक्षात उपलब्ध आहे. एमसीएमसी समितीकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ४८ तासांत अर्ज निकाली काढण्यात येतील.

जाहिरात नियमानुसार नसल्यास प्रमाणीकरण नाकारण्याचा किंवा बदल सुचविण्याचा अधिकार एमसीएमसी समितीला आहे. समितीने जाहिरातीत बदल सुचविल्यानंतर समितीकडून तसा संदेश प्राप्त झाल्याच्या २४ तासात उमेदवाराने त्यानुसार दुरुस्त्या करून नवीन जाहिरात सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणिकराणासाठीचा अर्ज विहित नमुन्यात सादर करावा. त्यात जाहिरात निर्मिती खर्च, जाहिरात प्रसारण खर्च व कालावधी, उमेदवार किंवा पक्षाचे नाव, स्वतंत्र व्यक्ती असल्यास प्रतिज्ञापत्र आदी महत्वाच्या बाबींच्या नोंदीसह दोन प्रतीत साक्षांकित केलेली जाहिरात संहिता (स्क्रिप्ट) व दृक-श्राव्य चित्रीकरण सीडी किंवा पेनड्राइव्हमध्ये समितीकडे देण्यात यावे. उमेदवार व राजकीय पक्षाच्या ब्लॉग, संकेतस्थळावरील, वैयक्तिक सोशल मीडिया अकाऊंटवरून पोस्ट केलेला राजकीय स्वरुपाचा संदेश, मजकूर, छायाचित्र, व्हीडीओ मजकूर राजकीय जाहिरात समजली जाणार नाही, त्यामुळे त्यासाठी पूर्वप्रमाणीकरण आवश्यक नाही. तथापि, जाहिरातीचे प्रमाणीकरण आवश्यक आहे.

**आत्मबोध ५१**

गुरुसेवा नाही । घडत जयाला।
नाहीच पावला । समाधान ॥ १ ॥

अतिथी सन्मान । नाही जो करत ।
नाहीच पावत । समाधान ॥ २ ॥

द्यावा हो आपण । इतरा संतोष ।
आशीर्वाद ईष । देत असे ॥ ३ ॥

सिद्धदास म्हणे । आचरण करे ।
दुःख नक्की हरे । तयाचिया ॥ ४ ॥

सिद्धदास, सोलापूर
७/०३/२०२२

# उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची आज दुसरी तपासणी

लातूर, दि. १२ : विधानसभा निवडणूक-२०२४ अंतर्गत लातूर जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या निवडणूक विषयक खर्चाच्या नोंदवहीची पहिली तपासणी निवडणूक खर्च निरीक्षक काकराला प्रसांत कुमार आणि डॉ. रामसिंह गुर्जर यांच्या उपस्थितीत ७ ते ९ नोव्हेंबर दरम्यान झाली. आता निवडणूक खर्च नोंदवहीची दुसरी तपासणी १३ नोव्हेंबर रोजी केली जाणार आहे.

उदगीर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची पहिली तपासणी ७ नोव्हेंबर रोजी, अहमदपूर, निलंगा विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांची पहिली खर्च तपासणी ८ नोव्हेंबर रोजी, तसेच लातूर ग्रामीण, लातूर शहर आणि औसा विधानसभा मतदारसंघातील निवडणूक खर्च तपासणी ९ नोव्हेंबर २०२४ रोजी झाली. त्यानंतर आता

निवडणूक खर्च निरीक्षक काकराला प्रसांत कुमार यांच्या उपस्थितीत १३ नोव्हेंबर रोजी लातूर ग्रामीण, लातूर शहर आणि अहमदपूर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांची, तसेच निवडणूक खर्च निरीक्षक डॉ. रामसिंह गुर्जर यांच्या उपस्थितीत उदगीर, निलंगा आणि औसा विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांची खर्च तपासणी केली जाणार आहे.

उमेदवारांनी स्वत: किंवा त्यांचे प्राधिकृत निवडणूक प्रतिनिधी यांनी खर्चाची नोंदवही, प्रमाणके, निवडणुकीसाठीच्या खर्चाचे बँक पासबुकसह व इतर आवश्यक सर्व अभिलेख्यासह सकाळी १० वाजता संबंधित विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहावे. तसेच खर्चाच्या नोंदवह्यांच्या तपासणी दरम्यान जनतेचे प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात आणि प्रत्येक पृष्ठासह १ रूपया इतकी रक्कम प्रदान केल्यावर कोणतीही व्यती कोणत्याही उमेदवाराच्या खर्चाच्या नोंदवहीची प्रत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून घेऊ शकतात.

# मतदार जनजागृतीसाठी एलईडी व्हॅनला जिल्हाधिकाऱ्याच्या हस्ते हिरवी झेंडी

## २० नोव्हेंबरला मतदानासाठी घराबाहेर पडण्याचे आवाहन

नांदेड(प्रतिनीधी): मागच्या निवडणुकीमध्ये ज्या ठिकाणी कमी मतदान झाले आहे, त्याठिकाणी एलईडी व्हॅनद्वारे मतदार जनजागृती करण्यात येईल. यामुळे मतदानाचा टक्का वाढण्यास मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी केले. आजपासून केंद्रीय संचार ब्युरो यांच्यामार्फत नांदेड विधानसभा मतदार संघातील गावामध्ये एलईडी व्हॅनद्वारे मतदार जनजागृती करण्यात येणार आहे. आज या एलईडी व्हॅनला जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते जिल्हाधिकारी परिसरात हिरवी झेंडी दाखविण्यात आली.

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके, केंद्रीय संचार ब्युरोचे सुमीत डोडल आदीची उपस्थिती होती.

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या २० नोव्हेंबरला मतदान होत आहे. सर्व मतदार संघातील मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावे. यासाठी स्वीप अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहेत. मतदारापर्यंत पोहोचवून जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. यासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय तसेच स्वीपचे नोडल अधिकारी यांच्यामार्फत विविध मतदार जनजागृती साठी कार्यक्रम सुरु आहेत.

मागील निवडणुकीमध्ये ज्या ठिकाणी मतदान कमी झाले आहे, त्याठिकाणी हे एलईडी वाहन जावून जनजागृती करेल. या वाहनामार्फत दृकश्राव्य माध्यमांचा वापर करुन मतदारांना आवाहन करणारे मतदानाचा संदेश देणे या वाहनाचा उद्देश आहे. या वाहनासोबत जिल्ह्यातील व राज्यातील मान्यवरांचे आवाहानात्मक संदेश प्रसारित होणार आहे. या वाहनाच्या वापरामुळे जिल्ह्यात नक्कीच मतदानाचा टक्का वाढण्यास मदत होणार असून, चांगल्या प्रकारे जनजागृती होईल, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.

येत्या २० नोव्हेंबरला मतदानासाठी घराबाहेर पडा

जिल्ह्यात मागील निवडणुकीत जिथे जिथे मतदान कमी झाले आहे, तीथे तीथे ही मतदार जनजागृतीची एलईडी व्हॅन फिरणार आहे. येत्या २० नोव्हेंबरला लोकसभा पोटनिवडणुक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान होत आहे. महाराष्ट्रात नांदेडला २५ वर्षानंतर या दोन्ही निवडणूक एकत्र होत आहेत. येत्या २० नोव्हेंबरला जेव्हा मतदार बुथवर जातील तेव्हा त्यांना दोन वेगवेगळे मशिन दिसतील. यावेळेस मतदारांना लोकसभा पोटनिवडणुक व विधानसभेसाठी दोन बटन दाबायचे आहे. प्रत्येक नागरिक, युवा-युवतींनी मतदानासाठी घराबाहेर पडून मतदान करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीपच्या प्रमुख मीनल करनवाल यांनी केले आहे.

मतदार जनजागृतीसाठी एलईडी व्हॅन जाणार या गावात

मतदार जनजागृतीसाठी केंद्रीय संचार ब्युरो यांच्यामार्फत एलईडी व्हॅन ११ ते २० नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्ह्यातील विविध गावामधून फिरणार आहे. यामध्ये ११ नोव्हेंबर रोजी नांदेड उत्तरच्या जिल्हाधिकारी कार्यालय, शिवाजी चौक, एसपी ऑफीस चौक, शिवाजीनगर, आयटीआय चौक, राज कार्नर, तरोडा नाका, भावसार चौक, अर्धापूर शहरात ३ ते ४ ठिकाणे (अर्धापूर येथे मुक्काम). दि. १२ नोव्हेंबर रोजी हदगाव व किनवट विधानसभा क्षेत्रात लहान फाटा, तामसा गावात ३ ते ४ ठिकाणी, हदगाव येथे ३ ते ४ ठिकाणी, माहूर ३ ते ४ ठिकाणी. (माहूर येथे मुक्काम). दिनांक १३ नोव्हेंबर रोजी हदगाव किनवट मतदार संघात




वाई, सारखणी येथे २ ठिकाणी, किनवट शहरात ४ ते ५ ठिकाणी, बोधडी, इस्लापूर येथे २ ठिकाणी, हिमायतनगर ३ ते ४ ठिकाणी. दिनांक १४ नोव्हेंबर रोजी भोकर मतदारसंघातील भोकर शहरात ४ ते ५ ठिकाणे, बारड येथे २ ठिकाणी, मुदखेड येथे ३ ते ४ ठिकाणी तसेच उमरी येथे मुक्काम. दिनांक १५ नोव्हेंबर रोजी उमरी शहर, धर्माबाद शहर, कुंडलवाडी शहर, बिलोली शहर, नायगाव शहर, दिनांक १६ नोव्हेंबर रोजी देगलूर शहर, होट्टल, मरखेल, करडखेड, मुक्रमाबाद,, दिनांक १७ नोव्हेंबर रोजी मुखेड मतदारसंघातील बाऱ्हाळी, मुखेड शहर, कुरुळा, पेठवडज, कंधार मुक्काम, १८ नोव्हेंबर रोजी लोहा मतदार संघातील कंधार शहर, माळाकोळी, लोहा शहर, सोनखेड, १९ नोव्हेंबर रोजी नांदेड दक्षिण मतदारसंघातील कारेगाव, जानापुरी, वाडीपाटी, विष्णुपूरी, हडको नांदेड, सिडको नांदेड, वाजेगाव, देगलूर नाका याठिकाण जाणार आहे. दिनांक २० नोव्हेंबर रोजी नांदेड दक्षिण उत्तर मतदार संघातील नमस्कार चौक नांदेड, हिंगोली नाका, अण्णाभाऊ साठे चौक, नवीन मोंढा चौक, आनंदनगर, भाग्यनगर, वर्कशाप कॉर्नर नांदेड याठिकाणी जाणार आहे.

यशवंत धाराशिव जिल्हा

बुधवार दि. १३ नोव्हेंबर २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## श्री सद्गुरू निरंजन रघुनाथ स्वामी ट्रस्टच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्या वाटप



कळंब, दि. १२ (प्रतिनिधी)– येथील श्री सद्गुरू निरंजन रघुनाथ स्वामी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्याचे वाटप करण्यात आले. रघुनाथ स्वामी महाराज यांचे कळंब हे जन्मगाव असून त्यांच्या जयंती उत्सव तसेच पादुका मंदिराचे देऊळकर गणपती शेजारी कसबा पेठ येथे निर्माण करण्यात आले आहे. यानिमित्त स्वामींच्या पादुकाची शोभायात्रा, दत्तयाग, पादुका प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रम झाला. यानंतर मंदिर प्रांगणात आयोजित कार्यक्रमात श्री सद्गुरू निरंजन रघुनाथ स्वामी महाराज चॅरिटेबल ट्रस्ट कळंबच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना ट्रस्टचे यशवंत दशरथ यांच्या हस्ते वही वाटप कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी ट्रस्टचे विलास खांडेकर, जगदीश गोरे, अनिल कुलर्कर्णी, नाना वाघमारे, बालाजी वाघमारे, अशोक तेलंग, हिलेंद्रसिंग राजपूत उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळविणाऱ्या सरकारला जनता कोसविळणार - ठाकरे

## धाराशिव जिल्ह्याला कलंक न लागू देणाऱ्या कैलास पाटील यांना आशिर्वाद द्यावेत



धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) – विधानसभेच्या निवडणुका लागल्या आहेत. भाजप व महायुतीची मंडळी बाहेर येत आहेत. त्यांना बहिणींवर खरोखरच प्रेम व काळजी असती तर सरकारमध्ये बसता क्षणीच महिलांना दीड हजार रुपये सुरू केले असते. मात्र लोकसभा निवडणुकीमध्ये भाजप व महायुतीच्या पेकाटात लाथ घातल्यामुळे त्यांनी या निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. आमचे सरकार आल्यानंतर लाडक्या बहिणींना तीन हजार रुपये देण्यात येतील. महायुती सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा कामामध्ये भ्रष्टाचार करून तो पुतळा कोसळविला आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे दैवत असलेल्या शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळविणाऱ्या सरकारला जनता कोसविळणार असा प्रहार माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दि.१२ नोव्हेंबर रोजी केला. दरम्यान मोदी व शिंदे सरकारच्या कारभारार जबरदस्त हल्लाबोल केला.

धाराशिव येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या मैदानावर माहितीचे उमेदवार आमदार कैलास पाटील (धाराशिव), धीरज पाटील (तुळजापूर) व माजी आमदार राहुल मोटे (परंडा) यांच्या संयुक्त प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, शिवसेना जिल्हा सहसंपर्कप्रमुख मकरंद राजेनिंबाळकर, काँग्रेसचे विश्वास शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर, डॉ प्रतापसिंह पाटील, संजय निंबाळकर, धनंजय शिंगाडे, विशाल शिंगाडे, तालुकाप्रमुख सतीश सोमाणी, शहर प्रमुख सोमनाथ गुरव ,अक्षय ढोबळे आदींसह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना ठाकरे म्हणाले की, धाराशिवकारांनी आपली निष्ठा ढळू दिली नाही, त्याबद्दल मला दंडवत घालावासा वाटतो. परंतू माझी शस्त्रक्रिया झाल्यामुळे मला वाकता येत नसल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. तसेच आमदार कैलास पाटील यांनी अमिषाला व खोक्याला बळी न पडता सोन्याच्या लंकेपर्यंत जाऊन तिथून परत आले. कारण त्यांना माहित होते की शिवसेनेची मशाल सोन्याची लंका जळणार आहे. विशेष म्हणजे भाजपने मला संपवण्यासाठी प्रयत्न केले व करत आहेत. मात्र जनता म्हणजेच तुम्ही माझ्या पाठीशी असल्यामुळे मोदी, शहा मला संपवू शकत नसल्याचे सांगत मोदी शहा यांच्यावर खास ठाकरे शैलीत निशाणा साधला.

महाविकास आघाडीचा आम्ही वचननामा प्रसिद्ध केला आहे. तर महायुतीने जुमला नामा प्रसिद्ध केला असल्याची तोफ त्यांनी डागली. विशेष म्हणजे महाविकास आघाडी सरकारमध्ये फक्त ७ मंत्री मंडळाच्या बैठकीत शेतकऱ्यांचे दोन लाख रुपये कर्ज माफ करण्याची घोषणा केली नाही. ती प्रत्यक्षात अमलात आणली. तसेच १० रुपयांमध्ये शिव भोजन थाळी सुरू केली. तर मोदी म्हणाले होते की, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होईल, १५ लाख रुपये खात्यात जमा केले जातील असे आश्वासन दिले होते. मात्र त्यापैकी त्यांनी काहीही केले नसल्याचा घनाघात करीत त्यांच्यावर हल्ला चढविला. कश्मीरमधील ३७० कलम हटविले, त्याचा सर्वसामान्यांना फायदा होईल असे वाटले होते. मात्र सर्वात जास्त फायदा अदानीला झाला असल्याचे त्यांनी सांगितले. आमच्या काळामध्ये शेतकऱ्यांच्या सोयाबीनला ८ ते १० हजार रुपये प्रती क्विंटलला भाव होता. तुमच्या काळात सोयाबीनला साडेतीन ते चार हजार रुपये भाव आहे. तुम्ही गद्दाराला ५० खोटी देता. शेतकरी राबराब राबतो त्याच्या कष्टाला किंमत न देता सोयाबीन पेक्षा कचऱ्याला अधिक किंमत देत असल्याचा निशाणा त्यांनी साधला. आमच्या काळामध्ये आम्ही सोयाबीन व दुधाला भाव दिला होता. त्यामुळे आमचे सरकार आल्यानंतर शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासह शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव देणार व जीवनावश्यक पाच वस्तूंचे भाव शेतकऱ्यांचे एक रुपयाचे देखील नुकसान न करता स्थिर ठेवणार, कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन देणार, अंगणवाडी कार्यकर्ती व आशा स्वयंसेविका यांचे मानधन वाढविणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच औसाहून उमरग्याला येताना माझे हेलिकॉप्टर उडान करू दिले नसल्याचे त्यांनी सांगितले. मोदी सोलापूरच्या विमानतळावर उतरले असताना मुद्दाम मला इतर कार्यक्रमास जाण्यास विलंब व्हावा यासाठी हा खोडसाळपणा केल्याचा आरोप त्यांनी केला. ३७० कलम रद्द करण्यासाठी मी तुमच्यासोबत होतो. मात्र तुम्ही दिलेले वचन न पाळल्यामुळे मी काँग्रेस सोबत गेलो तर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा जळफळाट होत असल्याचा टोला त्यांनी लगावला. तसेच मुस्लिम शिवसैनिक गेल्या २५–३० वर्षांपासून काम करीत आहेत. त्यावेळी त्यांची मते तुम्हाला चालत होती. आता ते आम्हाला मत करीत असताना तुम्हाला वोट जिहाद कसा आठवतो ? असा थेट सवाल त्यांनी विचारला. शिवसेनेचे हिंदुत्व हे घरातील चूल पेटणार आहे. तर तुम्हाला चूल पेटविता येत नसल्यामुळे तुम्ही थेट घर पेटवण्याचे काम करून आपली पोळी भाजत असल्याचे सांगत तुमचे हिंदुत्व घर पेटवणारे असल्याचा हल्लाबोल त्यांनी चढविला. आमच्या सरकारमध्ये नवाब मलिक मंत्री असताना त्यांनी देश विरोधी कारवाया केल्या म्हणून आमच्याकडे ठोस पुरावे आहेत असे सांगत मलिक यांना अटक केली. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भ्रष्टाचार केला असे सांगून त्यांच्यावर कारवाई करण्याचे नाटक केले. मात्र पाचव्या दिवशी त्यांना सरकारमध्ये सामील घेतले, त्याच दिवशी नाव मलिक तुरुंगाच्या बाहेर आले. नवा मलिक यांच्या प्रचारासाठी देवेंद्र फडणवीस जाणार का असा सवाल करीत फडणवीस यांनी वैचारिक गुंता केला असल्याचे त्यांनी सांगितले. तुमचा वैचारिक गुंता पुन्हा आम्हाला सोडवावा लागेल असे सांगत फडणवीस यांच्यावरही निशाणा साधला. महाविकास आघाडी महाराष्ट्र वाचविण्यासाठी महाराष्ट्राचा स्वाभिमान व अभिमान जपण्यासाठी मैदानात उतरली आहे. तर महायुती गुजरातला महाराष्ट्र वाहून नेण्यासाठी निवडणूक लढवीत असल्याचा प्रहार त्यांनी केला. विशेष म्हणजे महाविकास आघाडीला तुमची साथ हवी असून तुम्ही साथ द्यावी असे आवाहन ठाकरे यांनी उपस्थितांना केले. यावेळी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर म्हणाले, महाविकास आघाडी सरकारच्या काळात कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाचा प्राधान्यक्रम बदलून दुधाळवाडी साठवण तलाव व रामदारा तलावाचा समावेश करून त्यासाठी पुरेशा निधीची तरतूद केली होती. तर जिल्ह्यातील कोल्हापुरी पद्धतीच्या पाटबंधाऱ्यावर बॅरेजेस बसविण्यासाठी आराखडा तयार केला होता. मात्र महायुती सरकारने त्या सर्व कामांना स्थगिती दिली. त्यामुळे आमचे सरकार सत्तेत आल्यानंतर ही सर्व कामे प्राधान्याने केली जातील असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच लाडक्या बहिणींना दीड हजार ऐवजी ३ हजार रुपये देण्यात येतील व महिलांना मोफत एसटी प्रवास देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. आमदार कैलास पाटील म्हणाले की, शहरातील रस्ते व इतर कामासाठी निधी मंजूर असताना या सरकारने सर्व कामांना स्थगिती दिली. त्यामुळे आम्ही न्यायालयात गेलो न्यायालयाने स्थगिती उठवली मात्र त्यांचे आदेश या सरकारने जो मानले नाहीत. शेतकऱ्यांचा पिक विमा रखडविण्यासह पीक नुकसानीचे अनुदान देण्यास देखील या सरकारने जाणून बुजून दुर्लक्ष केल्या असल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी शिवसैनिक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी धनंजय शिंगाडे यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध व भारतीय संविधानाची प्रत देऊन ठाकरे यांचा सत्कार करण्यात आला. तर मुस्लिम समाजाच्यावतीने देखील ठाकरे यांचा सन्मान करण्यात आला.

### प्रशांत चेडे, मुंदडा यांच्यासह अनेकांचा सेनेत प्रवेश

यावेळी वाशी येथील शिंदे सेनेचे प्रशांत चेडे, कळंब येथील संजय मुंदडा, धाराशिव येथील मुंडे यांच्यासह अनेकांनी उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला. त्यामुळे शिवसैनिकांमध्ये उत्साह संचारला आहे.

## संविधान रॅलीविषयी मतदार जनजागरण समितीचे निवेदन



धाराशिव, दि. १२ (प्रतिनिधी)– २६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिन हा राष्ट्रीय सण उत्सव असुन हा मोठ्या प्रमाणात साजरा केला पाहिजे याबाबतचे लेखी निवेदन मतदार जनजागरण समितीच्या वतीने जिल्हाधिकाजयांना संविधान उद्देशिका प्रत भेट देऊन देण्यात आले.

२६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिन साजरा होत असून, मतदार जनजागरण समितीच्या वतीने संविधान जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे. तसेच या संदर्भात जिल्हाधिकारी यांच्याशी मतदार जनजागरण समितीच्या सदस्यांनी चर्चा केली. संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संविधान जनजागृती रॅलीत शाळा कॉलेजचे विद्यार्थी, शासकीय कर्मचारी, पोलीस बॅण्ड पथक, संविधान रथ यासह संविधान अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त समिती गठीत करुन कार्यक्रम आयोजित करण्याबाबतही चर्चा केली. यावर जिल्हाधिकारी सचिन ओम्बासे यांनी, विद्यार्थ्यांसह सर्वसामान्यांना सोप्या भाषेत संविधान समजेल अशा पध्दतीचे आपण नियोजन करू, असे आश्वासन दिले. निवेदन देतेवेळी समितीचे अध्यक्ष एम. डी. देशमुख, सचिव अब्दुल लतिफ, उपाध्यक्ष गणेश वाघमारे, सहसचिव बाबासाहेब गुळीग, सदस्य धनंजय वाघमारे, अमर आगळे, आलिशान कुरेशी, श्रीकांत गायकवाड आदी उपस्थित होते.

## कामठा येथे वारकरी साहित्य परिषदेचा वर्धापन दिन साजरा

तुळजापूर, दि. १२ (प्रतिनिधी)– तालुक्यातील कामठा येथे ११ नोव्हेंबर रोजी धाराशिव वारकरी साहित्य परिषदेच्या वतीने वारकरी साहित्य परिषदेचा १३ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संत मुक्ताई–जनाई हरिपाठ मंडळाच्या वतीने गावातील प्रमुख मार्गावरून दिंडीचे आयोजन केले होते.

कार्यक्रमासाठी धाराशिव जिल्हा महिला अध्यक्षा हभप सुनीतादेवी महाराज आडसूळ, हभप महादेव महाराज आडसूळ, महिला तालुकाध्यक्षा हभप वसुधाताई कुलकर्णी यांच्यासह हरिपाठ मंडळाच्या अध्यक्षा, उपाध्यक्षा, जिल्हा कार्यकारणीमधील महिला सदस्या, तुळजापूर, कामठा, आपसिंगा, कात्री, दहिवडी, खुंटेवाडी, सलगरा, काटी, वरवंटी, सावरगाव, वाणेवाडी, गवळेवाडी, काक्रंबा गावातील महिला सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## बनावट इंन्सुरन्सद्वारे १८ लाख ७९ हजारास गंडविले

धाराशिव, दि. १२ (प्रतिनिधी)– खोटे अमिष दाखवून एका व्यक्तीस तब्बल १८ लाख ७९ हजार रूपयांचा चुना लावल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धाराशिव शहरातील गणेश नगर भागात स्वप्निल संजय मोहिते (वय २८) हे राहतात. मोहिते यांना २ ते ६ नोव्हेंबर दरम्यान घरी असताना त्यांच्या मोबाईलवर ८८८२१८४६८२ या क्रमांकावरून फोन आला. सदर फोन नंबर वरील व्यक्तीने मोहिते यांना खोटे अमिष दाखवून त्यांच्या बँक खात्याची माहिती जाणून घेतली. त्यावर स्वप्निल मोहिते यांनी फोनवरील व्यक्तीस आपल्या बॅक खाते क्र. १६३७०१५०६८०२ ची माहिती दिली असता फोनवरील व्यक्तीने बनावट इंन्सुरन्स काढून मोहिते यांना ओटीपी मागून घेतला. त्यानंतर मोहिते यांनी ओटीपी सांगितल्यानंतर त्यांच्या नमूद बँक खात्यातून तब्बल १८ लाख ७९ हजार रूपयांची रक्कम काढण्यात आल्याचा संदेश त्यांना प्राप्त झाला. दरम्यान, आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर स्वप्निल मोहिते यांनी तातडीने सायबर पोलीस ठाणे गाठून फिर्याद दाखल केली. त्यानुसार ११ नोव्हेंबर रोजी नमूद मोबाईल क्रमांकाच्या व्यक्तीविरूद्ध सायबर पोलीस ठाण्यात भान्यासं कलम ३१८ (१) सह कलम ६६ (सी), ६६ (डी) महिती तंत्रज्ञान सुधारित अधिनियम २००८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आ. पाटील यांच्या प्रचारार्थ मल्हार पाटील यांच्या गडदेवधरी, शिंगोलीत प्रचार सभा



धाराशिव, दि. १२ (प्रतिनिधी)– तुळजापूर विधानसभा महायुतीचे उमेदवार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ आशीर्वाद यात्रेतून गडदेवधरी, शिंगोली, शिंगोली तांडा, जहागीरदार वाडी येथील मतदारांशी मल्हार पाटील यांनी संवाद साधला.

यावेळी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी ५ वर्षात केलेल्या विकास कामांची माहिती आपल्या सर्वांसमोरच आहे. तांडा सुधार योजनेतून विकास निधी उपलब्ध करून दिला आहे. कौडगाव एमआयडीसीमुळे आपल्या गावातील तरुणांना रोजगार मिळणार असून, अर्थकारणाला मोठी चालना मिळणार आहे. धाराशिव–तुळजापूर–सोलापूर रेल्वेमार्गाचे काम सुरु झाले आहे. धाराशिव रेल्वेस्टेशन आता मोठे जंक्शन होणार आहे. त्यामुळे येथे लहान मोठे व्यवसाय सुरु होऊन येथील तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. एवढ्यावरच न थांबता आपल्याला आणखीन विकास साधायचा आहे. मतदार संघाचा चेहरा मोहरा बदलायचा आहे. यासाठी त्यांना पुन्हा एकदा प्रचंड मतांनी निवडून द्या, असे आवाहनही मल्हार पाटील यांनी केले. यावेळी मतदारांनी ही गावे डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यापासून सतत आपल्या कुटुंबा सोबतच आहेत आणि पुढेही राहतील. त्यामुळे तुम्ही काही काळजी करू नका, आमच्या गावातून मोठे मताधिक्य देऊ, अशीही ग्वाही ग्रामस्थांनी दिली.

## रोषणपुरी येथील रूपामाता नॅचरल शुगरचा गळीत हंगाम सुरू



तुळजापूर, दि. १२ (प्रतिनिधी)– रोषणपुरी (ता. माजलगाव जि. बीड) येथील रूपामाता नॅचरल शुगर्स युनिट क्र. दोन या कारखान्याच्या दुसजया गळीत हंगामाची सुरुवात मोळीपूजन कार्यक्रमाने झाली. मागील वर्षी पहिला गळीत हंगाम यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर यार्वर्षी कारखाना वेळेत सुरु करण्यात आला आहे.

गळीत हंगाम शुभारंभ कार्यक्रमास रूपामाता उद्योग समुहाचे व कारखान्याचे संचालक ॲड. अजितकुमार गुंड पाटील, रूपामाता शुगरचे संचालक भाऊसाहेब गुंड, देवखेडा येथील सरपंच अण्णासाहेब खडे, केदारेश्वर बँकेचे चेअरमन भगवान कदम, नागडगाव येथील रमेश कदम, शेतकरी राठोड आदींची उपस्थिती होती.

रूपामाता कारखाना रोषणपुरी भागात सुरू झाल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांची सोय झाली आहे. यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांना आपला ऊस इतर कारखान्याकडे देण्याची गरज भासणार नाही. शेतकजयाची होणारी परवड थांबणार आहे. मागील वर्षी प्रमाणे या हंगामात देखील सर्वांच्या सहकार्याने अधिकाधिक उसाचे गाळप करण्यात येईल, असे ॲड. अजित गुंड यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमास चिफ इंजिनियर समुद्रे, चिफ केमिस्ट धुमाळ, असिस्टंट इंजिनिअर चव्हाण, असिस्टंट इंजिनिअर स्वामी, शेतकी अधिकारी मुलाणी व कर्मचारी मोठ्या संख्येने होते.

## ऋतिक पटेकर नक्कीच यशस्वी गायक होईल– आशिष शिंदे

### तरी तिच्यावर मी प्रेम करतोय...' अल्बमचे प्रकाशन



कळंब, दि. १२ (प्रतिनिधी)– मी आणि ऋतिक पटेकर आम्ही दोघे लहानपणापासून येडेश्वरी बँजो गाडीवर काम केले आहे. ऋतिक हा खूप मेहनती असून, भविष्यात नक्कीच तो यशस्वी गायक होईल, असा विश्वास गीतकार आशिष शिंदे यांनी व्यक्त केला. येथील सर्वसामान्य कुटुंबातील गायक ऋतिक पटेकर यांचा '...तरी तिच्यावर मी प्रेम करतोय...' या अल्बम साँगचे प्रकाशन झाले याप्रसंगी ते बोलत होते.

पहिल्याच दिवशी या गाण्याने सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे. नवोदित गायकाचे कौतुक करण्यासाठी गायक किशोर जावळे, गीतकार आशिष शिंदे, निर्माते पवन घायतडक, नायिका कांचन घुगे, आई–वडील अंजली मोहन पटेकर यांची उपस्थिती होती. त्यांनी ऋतिक पटेकर याचे कौतुक केले. कसलीही पार्श्वभूमी नसताना ग्रामीण भागात स्वत:च्या कलेवर त्याने जो नावलौकिक मिळवला आहे ते कौतुकास्पद आहे. ऋतिकला नक्कीच यापुढील काळामध्ये त्याच्या या छंदाचे व्यवसायात रूपांतर होऊन यश मिळेल, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त करून मदत करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी महाराष्ट्रातील कलाकार, संगीतकार, गायक, बँजो मालक उपस्थित होते. पाखरा आजाद केलं तुला फेम गायक किशोर जावळे यांनी ऋतिक पटेकर हा एक चांगला कलाकार आहे. सदैव नवनवीन प्रोजेक्ट लोकांसमोर घेऊन येत असतो. मी अख्ख्या महाराष्ट्राला विनंती करतो की जसे प्रेम तुम्ही आमच्या गाण्याला देतात तसेच तुम्ही या गाण्याला द्या अशी विनंती त्यांनी केली. गीतकार आशिष शिंदे म्हणाले, माझे हावरगाव हे गाव आहे. मी आणि ऋतिक सोबतच येडेश्वरी बँजो गाडीवर लहानपणापासून काम करत होतो. जसा संघर्ष मी केला तसाच संघर्ष ऋतिक देखील करत आहे. यावेळी ऋतिक पटेकर यांनी सर्वांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

# संपादकीय

## मुंबईकरांच्या आरोग्याची हेळसांड

मुंबई जागतिक पातळीवर आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रगत शहर मानले गेले असले तरी शहराची परिस्थिती पाहता ही खूप गुंतागुंतीची व बकालतेची दिसते. एकीकडे उंचच उंच बांधले गेलेले टॉवर दुसरीकडे घनदाट परिस्थितीत असलेल्या झोपडपट्ट्या हे शहराची सर्वसामान्याची व गरीब लोकांची जगण्याची तफावत दर्शवून देते, तर दुसरीकडे आपल्या रोजच्या प्रपंचाच्या नादात असलेला मध्यमवर्ग दिवस-रात्र काम करताना दिसतो. मुंबईच्या समस्या मांडाव्या एवढ्या कमीच आहे. त्यातच आरोग्य, समस्यांची स्थिती विविध तशी समाधानकारक नाही. नुकताच मुंबईतील आरोग्य सेवा, मुख्य आजारांचा प्रादुर्भाव, श्वसनाचे आजार आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची संख्या यांच्यावर एक अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. त्यात बऱ्याच अंशी काही भयानक गोष्टी समोर आल्या. ज्या खरंच मुंबईकरांना विचार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या आहेत. जीवन शैलीशी निगडित मधुमेहासारख्या आजारामुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या २०१४ साली २४२८ होती. जी २०२२ पर्यंत १४,२०७ झाली. मधुमेहाच्या मृत्यूच्या संख्येत ४८५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे आता मृत्यूच्या कारणांमध्ये मधुमेह सर्वात वरचे कारण ठरत आहे. आजाराचे हे प्रमाण आटोक्यात आणणे खूपच जरुरीचे आहे. त्यासाठी शहरी नियोजन आणि विकासाच्या संदर्भात भारत सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाचे शहरी आणि प्रादेशिक विकास योजना आखणी आणि अंमलबजावणी दिशा निर्देश महत्त्वाचे असून त्यांचे पालन होणे अत्यंत गरजेचे आहे.

व्यक्तीचे आरोग्य स्वास्थ आणि शारीरिक हालचालींकरता दरडोई किमान दहा चौरस मीटर खुली जागा उपलब्ध असणे आवश्यक आहे. मात्र मुंबई विकास आराखडामध्ये दरडोई केवळ तीन चौरस किलोमीटर खोली जागा प्रस्तावित केली आहे. मुंबईत दर व्यक्तीमागे उपलब्ध खोली जागा वाढवण्यासाठी त्वरित पावले उचलण्याची गरज यावरून अधोरेखित होत आहे. तसेच नागरिकांचे आरोग्य व स्वास्थ जपण्यासाठी उपलब्ध पायाभूत सेवा सुविधा पुरेशा नसून त्या विस्तारण्याची गरज आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता घसरत चालली आहे. २०१९ ते २०२२ या कालावधीत शहरातील सरासरी हवेच्या गुणवत्तेची घसरण समाधानकारक वरून मध्यम समाधानकारक वर झाली आहे. याच कालावधीत श्वसनाचे गंभीर आजारामुळे मृत्यू पावलेल्यांची संख्या ३३ हजार ७११ होती, तर आणखी १६,३४५ जणांचे मृत्यू टीबीमुळे झालेले आहेत. हवा प्रदूषणाचा जबरी फटका नागरिकांना बसत आहे. २०२३ मध्ये हीच हवेची गुणवत्ता आणखी घसरली आहे. कारण वर्षभरात हवेची गुणवत्ता एकाही महिन्यात चांगली नव्हती हे गंभीर आहे. मुंबईत दिशा निर्देशनाच्या तुलनेत ५२५ दवाखाने कमी आहेत. शहरात सध्या महापालिकेचे १९१ दवाखाने अस्तित्वात आहे; परंतु यातील ९५ टक्के दवाखाने दिवसाचे केवळ सात तास चालू असतात. २०२२ पासून वाढवत महापालिकेने २०७ हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे क्लिनिक सुरू केली. आरोग्य सेवा विस्तारण्यासाठी उचललेले पाऊल चांगले होते; परंतु २०७ पैकी केवळ ९७ क्लिनिक आधीच्याच महापालिका दवाखान्यांमध्ये चालवली जातात आणि केवळ सहा टक्के म्हणजेच २०७ पैकी १३ दवाखाने १४ तास सेवा देतात. आरोग्य सेवांची उपलब्धता वाढवण्यासाठी सर्व महापालिका दवाखाने १४ तास चालू राहिले पाहिजेत. विशेषत: झोपडपट्टी बहुल प्रभागांमध्ये जिथे लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे तिथे दवाखान्याची सर्वाधिक गरज आहे. २०१८-१९ ते २०२५ या सात वर्षांत महापालिकेने आरोग्याचे बजेट ३६३७ कोटींवरून ७१९१ कोटी आहे. म्हणजेच त्यात ९८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्या दशकात मुंबई महापालिका दवाखान्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता तिप्पट झाल्याचे आढळून आले आहे.

२०१४ साली हे प्रमाण वाढून १२ टक्क्यांनी वाढून हे प्रमाण ३७% झाले आहे. दर पंधरा हजार लोकसंख्येमागे एक दवखाना पाहिजे असा शहरी आणि प्रादेशिक विकास योजना आखणी आणि अंमलबजावणी दंडक असून २०२३ पर्यंत त्याची पूर्तता मुंबईतील एकही वार्डामध्ये झालेली नाही. गेल्या तीन वर्षांपासून महापालिका निवडणूक प्रलंबित आहेत. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या अनुपस्थित महापालिकेचा कारभार चालू आहे. त्यामुळे सक्रिय आरोग्य समिती अस्तित्वात नाही. मुंबईतील आरोग्याची सद्यस्थिती सुधारण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था कार्यक्षम करण्यास प्राधान्य द्यायला हवी आणि यासाठी नागरिकांनी पुढाकार व सहभाग घ्यायला हवा. आरोग्य संबंधित तसेच मृत्यू आजारासंबंधी डेटा तत्काळ संकलित होण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य व्यवस्थापन माहिती यंत्रणा पूर्णत: कार्यान्वित करणे गरजेचे आहे. महापालिकेने मुंबईकरांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि जागतिक दर्जाचे शहर म्हणून मुंबईचे स्थान उंचावण्यासाठी खुल्या जागांच्या विस्तारण्याला आणि आरोग्य सेवा सक्षम करण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. नागरिकांचे आरोग्य व जीवनशैली सुधारण्यासाठी केलेल्या अशा बदलांमुळे जीवनशैली निगडित आराजाचे आव्हान आटोक्यात यायला मदत होईल.

## नागरीकांच्या आरोग्याची हेळसांड



मुबई जागतिक पातळीवर आतरराष्ट्रीय स्तरावर प्रगत शहर मानले गेले असले तरी शहराची परिस्थिती पाहता ही खूप गुंतागुंतीची व बकालतेची दिसते. एकीकडे उंचच उंच बांधले गेलेले टॉवर दुसरीकडे घनदाट परिस्थितीत असलेल्या झोपडपट्ट्या हे शहराची सर्वसामान्याची व गरीब लोकांची जगण्याची तफावत दर्शवून देते, तर दुसरीकडे आपल्या रोजच्या प्रपंचाच्या नादात असलेला मध्यमवर्ग दिवस-रात्र काम करताना दिसतो. मुंबईच्या समस्या मांडाव्या एवढ्या कमीच आहे. त्यातच आरोग्य, समस्यांची स्थिती विविध तशी समाधानकारक नाही. नुकताच मुंबईतील आरोग्य सेवा, मुख्य आजारांचा प्रादुर्भाव, श्वसनाचे आजार आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची संख्या यांच्यावर एक अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. त्यात बऱ्याच अंशी काही भयानक गोष्टी समोर आल्या. ज्या खरंच मुंबईकरांना विचार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या आहेत. जीवन शैलीशी निगडित मधुमेहासारख्या आजारामुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या २०१४ साली २४२८ होती. जी २०२२ पर्यंत १४,२०७ झाली. मधुमेहाच्या मृत्यूच्या संख्येत ४८५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे आता मृत्यूच्या कारणांमध्ये मधुमेह सर्वात वरचे कारण ठरत आहे. आजाराचे हे प्रमाण आटोक्यात आणणे खूपच जरुरीचे आहे. त्यासाठी शहरी नियोजन आणि विकासाच्या संदर्भात भारत सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाचे शहरी आणि प्रादेशिक विकास योजना आखणी आणि अंमलबजावणी दिशा निर्देश महत्त्वाचे असून त्यांचे पालन होणे अत्यंत गरजेचे आहे.व्यक्तीचे आरोग्य स्वास्थ आणि शारीरिक हालचालींकरता दरडोई किमान दहा चौरस मीटर खुली जागा उपलब्ध असणे आवश्यक आहे. मात्र मुंबई विकास आराखडामध्ये दरडोई केवळ तीन चौरस किलोमीटर खोली जागा प्रस्तावित केली आहे. मुंबईत दर व्यक्तीमागे उपलब्ध खोली जागा वाढवण्यासाठी त्वरित पावले उचलण्याची गरज यावरून अधोरेखित होत आहे. तसेच नागरिकांचे आरोग्य व स्वास्थ जपण्यासाठी उपलब्ध पायाभूत सेवा सुविधा पुरेशा नसून त्या विस्तारण्याची गरज आहे. मुंबईतील हवेची गुणवत्ता घसरत चालली आहे. २०१९ ते २०२२ या कालावधीत शहरातील सरासरी हवेच्या गुणवत्तेची घसरण समाधानकारक वरून मध्यम समाधानकारक वर झाली आहे. याच कालावधीत श्वसनाचे गंभीर आजारामुळे मृत्यू पावलेल्यांची संख्या ३३ हजार ७११ होती, तर आणखी १६,३४५ जणांचे मृत्यू टीबीमुळे झालेले आहेत. हवा प्रदूषणाचा जबरी फटका नागरिकांना बसत आहे. २०२३ मध्ये हीच हवेची गुणवत्ता आणखी घसरली आहे. कारण वर्षभरात हवेची गुणवत्ता एकाही महिन्यात चांगली नव्हती हे गंभीर आहे. मुंबईत दिशा निर्देशनाच्या तुलनेत ५२५ दवाखाने कमी आहेत. शहरात सध्या महापालिकेचे १९१ दवाखाने अस्तित्वात आहे; परंतु यातील ९५ टक्के दवाखाने दिवसाचे केवळ सात तास चालू असतात. २०२२ पासून वाढवत महापालिकेने २०७ हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे क्लिनिक सुरू केली. आरोग्य सेवा विस्तारण्यासाठी उचललेले पाऊल चांगले होते; परंतु २०७ पैकी केवळ ९७ क्लिनिक आधीच्याच महापालिका दवाखान्यांमध्ये चालवली जातात आणि केवळ सहा टक्के म्हणजेच २०७ पैकी १३ दवाखाने १४ तास सेवा देतात. आरोग्य सेवांची उपलब्धता वाढवण्यासाठी सर्व महापालिका दवाखाने १४ तास चालू राहिले पाहिजेत. विशेषत: झोपडपट्टी बहुल प्रभागांमध्ये जिथे लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे तिथे दवाखान्याची सर्वाधिक गरज आहे. २०१८-१९ ते २०२५ या सात वर्षांत महापालिकेने आरोग्याचे बजेट ३६३७ कोटींवरून ७१९१ कोटी आहे. म्हणजेच त्यात ९८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्या दशकात मुंबई महापालिका दवाखान्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता तिप्पट झाल्याचे आढळून आले आहे.२०१४ साली हे प्रमाण वाढून १२ टक्क्यांनी वाढून हे प्रमाण ३७% झाले आहे. दर पंधरा हजार लोकसंख्येमागे एक दवाखाना पाहिजे असा शहरी आणि प्रादेशिक विकास योजना आखणी आणि अंमलबजावणी दंडक असून २०२३ पर्यंत त्याची पूर्तता मुंबईतील एकही वार्डामध्ये झालेली नाही. गेल्या तीन वर्षांपासून महापालिका निवडणूक प्रलंबित आहेत. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या अनुपस्थित महापालिकेचा कारभार चालू आहे. त्यामुळे सक्रिय आरोग्य समिती अस्तित्वात नाही. मुंबईतील आरोग्याची सद्यस्थिती सुधारण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था कार्यक्षम करण्यास प्राधान्य द्यायला हवी आणि यासाठी नागरिकांनी पुढाकार व सहभाग घ्यायला हवा. आरोग्य संबंधित तसेच मृत्यू आजारासंबंधी डेटा तत्काळ संकलित होण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य व्यवस्थापन माहिती यंत्रणा पूर्णत: कार्यान्वित करणे गरजेचे आहे. महापालिकेने मुंबईकरांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि जागतिक दर्जाचे शहर म्हणून मुंबईचे स्थान उंचावण्यासाठी खुल्या जागांच्या विस्तारण्याला आणि आरोग्य सेवा सक्षम करण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. नागरिकांचे आरोग्य व जीवनशैली सुधारण्यासाठी केलेल्या अशा बदलांमुळे जीवनशैली निगडित आराजाचे आव्हान आटोक्यात यायला मदत होईल.

-अल्पेश म्हात्रे

## समुद्रस्तरात वाढ
## कोकण विकासाची संधी

अनेक अहवाल आणि संशोधनानुसार, जागतिक तापमान वाढ, म्हणजेच ग्लोबल वॉर्मिंग आणि त्यामुळे होणारी समुद्र पातळीची वाढ हे मुंबईसारख्या किनारपट्टीवरील शहरांसाठी धोका निर्माण करू शकतात. २०५० पर्यंत काही भाग जलमय होण्याची शक्यता आहे, विशेषतः दक्षिण मुंबईचे काही क्षेत्रे आणि कमी उंचीवरील समुद्रकिनारी असलेले भाग मुंबई शहराच्या संभाव्य जलमग्न परिस्थितीत लोकांचे पुनर्वसन एक व्यापक आणि दीर्घकालीन प्रक्रिया असेल. या प्रक्रियेत अनेक स्तरांवर नियोजन, नवकल्पना आणि संपूर्ण समाजाचा सहभाग आवश्यक आहे. याकरिता पुढील मुद्द्यांवर अधिक खालवर चर्चा होणे आवश्यक आहे.

हरिष प्रभू

धोरणात्मक दृष्टिकोन-राष्ट्रीय पुनर्वसन धोरण : एनडीएमए आणि राज्य सरकारांना एकत्र येऊन पुनर्वसनाचा धोरणात्मक आराखडा तयार करावा लागेल. हे धोरण नवा आर्थिक-समाज' उभारणीसाठी पायाभूत असेल. यामध्ये जलसंपदा व वनसंवर्धन मंत्रालय, अर्थमंत्रालय आणि अन्य शासकीय विभागांचा समन्वय असावा लागेल.

आंतरराष्ट्रीय सहकार्य : मुंबईसारख्या शहराच्या जलमग्न होण्याचे परिणाम संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेवर पडतील. त्यामुळे भारताने आंतरराष्ट्रीय संघटनांशी संपर्क साधून वित्तीय आणि तांत्रिक सहकार्याची योजना तयार करावी लागेल. हवामान बदलाशी संबंधित समस्यांसाठी जागतिक बँक आणि संयुक्त राष्ट्रांच्या सहाय्याने विशेष अनुदान मिळवण्याचे प्रयत्न होऊ शकतात.

भौगोलिक विश्लेषण आणि स्मार्ट स्थलांतर

स्मार्ट सिटी मॉडेल : पुनर्वसनासाठी नव्या स्मार्ट सिटीच्या संकल्पना वापरणे उपयुक्त ठरेल. या शहरांना पर्यावरणपूरक बनवण्यासाठी ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान, सोलर पॉवर, सायकलिंग ट्रॅक्स, ग्रीन बिल्डिंग्स यांचा वापर केला जाऊ शकतो. प्रत्येक शहरात सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक केंद्रांची स्थापना करून पुनर्वसित लोकांसाठी एक आदर्श जीवनशैली निर्माण करता येईल.रिमोट सेंसिंग आणि जीआयएस तंत्रज्ञानाचा वापर : योग्य स्थलांतरासाठी भू-तांत्रिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाऊ शकतो. हे तंत्रज्ञान वापरून हवामान, तापमान आणि भूवैज्ञानिक माहितीच्या आधारे सुरक्षित ठिकाणांची निवड करणे सोपे होईल.

स्थानिक समुदाय आणि सामाजिक पुनर्वसन

सांस्कृतिक जोडणी आणि एकत्रीकरण : मुंबईच्या सांस्कृतिक, भाषिक आणि जातीय विविधतेचा विचार करून, नव्या ठिकाणी समुदायांमध्ये सामाजिक जोडणी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल. सामुदायिक केंद्रे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सर्वांसाठी सार्वजनिक सुविधा पुरवल्या जातील.

समुदायविकास योजना : पुनर्वसित ठिकाणी नव्याने शाळा, महाविद्यालये आणि आरोग्य केंद्रे उभारणे आवश्यक असेल. तसेच सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने लोकांच्या गरजांनुसार विशेष योजनांची अंमलबजावणी केली जाईल.

पुनर्वसित अर्थव्यवस्था

नव्या उद्योगांचा विकास : मुंबईमध्ये बंदर, व्यापार आणि वित्तीय केंद्रांसह मोठे उद्योग आहेत. हे उद्योग स्थलांतरित करणे आव्हानात्मक असले तरीही, अन्य भागात नवा व्यापार आणि औद्योगिक क्षेत्रे निर्माण करणे आवश्यक ठरेल. विद्यमान बंदर व्यवस्था दुसऱ्या जागी स्थलांतरित करून त्याचे सुदृढीकरण करणे महत्त्वाचे ठरेल. पारंपरिक व्यवसायांचे जतन : मुंबईतील लघुउद्योग, हस्तकला, आणि स्थानिक पारंपरिक व्यवसायांच्या पुनर्संस्थापनासाठी विशेष उपाययोजना कराव्या लागतील. अशा व्यवसायांना पुनर्संचित करण्यासाठी स्थानिक व्यावसायिक केंद्रे विकसित करता येतील.

शहरी रहिवासी प्रकल्प आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान

फ्लोटिंग हाउस आणि फ्लोटिंग सिटीज' : सध्या अनेक विकसित देश जलमग्न भागांसाठी फ्लोटिंग सिटी प्रकल्प विकसित करत आहेत. भारतानेही त्याचा विचार करून असे प्रकल्प भविष्यात समुद्रस्तर वाढीच्या संकटाला प्रभावीपणे तोंड देऊ शकतात.

गृहसंकल्पना - ऊर्जाबचत आणि जलसंवर्धन : नवीन गृहप्रकल्पांत ऊर्जाबचत करणारे उपकरणे, सौरऊर्जा प्रणाली, वॉटर हार्वेस्टिंग प्रणाली आणि जलस्रोत वापरणारे बागा विकसित करता येतील.

सर्वसमावेशक शैक्षणिक आणि प्रशिक्षण सुविधा

नव्या कौशल्यांसाठी प्रशिक्षण केंद्रे : पुनर्वसित ठिकाणी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्यासाठी स्थानिक लोकांना आधुनिक आणि तंत्रज्ञानावर आधारित कौशल्य प्रशिक्षण देण्याची गरज आहे. अशा प्रशिक्षण केंद्रांतून स्थानिकांना नवीन रोजगाराचे मार्ग मिळतील आणि त्यांचा सामूहिक विकास होईल. नव्या पिढीला पर्यावरण जागरूकता : शालेय अभ्यासक्रमांत हवामान बदल, पर्यावरणीय जागरूकता, आणि नव्या जमिनीवर कसे जीवन जगावे यासारख्या विषयांचा समावेश करून लोकांना अधिक जागरूक बनवले जाईल.

आर्थिक मदत आणि कर्ज योजना

स्थानिक बँका आणि वित्तीय संस्थांचे सहकार्य : पुनर्वसित लोकांना आर्थिक स्थैर्य देण्यासाठी विशेष कर्ज योजना तयार केल्या जातील. पुनर्वसनासाठी सरकार, स्थानिक बँका आणि इतर वित्तीय संस्थांकडून आर्थिक सहाय्य पुरवले जाईल. अशा योजनेतून लोकांना त्यांच्या नव्या ठिकाणी आर्थिक मदत मिळून रोजगाराच्या नव्या संधी मिळतील. सीएसआरचा वापर: अनेक कंपन्या सीएसआरच्या माध्यमातून मुंबईसारख्या जलमग्न शहरांच्या पुनर्वसनात योगदान देऊ शकतात. उदा., टाटा, रिलायन्स, महिंद्रा इत्यादी कंपन्या आपले सीएसआर निधी वापरून समाजसेवा करू शकतात.

पुनर्वसनाचे नियंत्रण आणि मॉनिटरिंग

निगराणी यंत्रणा : पुनर्वसनाची प्रक्रिया योग्यरित्या चालू आहे की नाही, हे पाहण्यासाठी आणि प्रत्येक टप्प्यावर परिणामकारकतेचे मापन करण्यासाठी सरकारने एक कडक निगराणी यंत्रणा विकसित करावी. प्रत्येक पुनर्वसन प्रकल्पात फील्ड ऑफिसर आणि स्वयंसेवकांची नेमणूक करून, कामाच्या प्रगतीवर सातत्याने नियंत्रण ठेवले जाईल. पुनर्वसनाचे तांत्रिक प्लॅटफॉर्म : लोकांना त्यांच्या पुनर्वसनाच्या प्रक्रियेची माहिती मिळावी, तक्रारी दाखल करता याव्यात आणि त्यांची स्थिती जाणून घेता यावी यासाठी एक डिजिटल प्लॅटफॉर्म तयार केला जाऊ शकतो.

भविष्यातील योजना आणि दीर्घकालीन धोरणे

जलसंकटाच्या उपाययोजना: भविष्यातील जलसंकट टाळण्यासाठी जलसंवर्धन, जलशुद्धीकरण, आणि पुनर्वापर या उपाययोजनांवर अधिक भर दिला जाईल.

अलार्म सिस्टीम : भविष्यात आणखी समुद्रस्तर वाढल्यास लोकांना वेळेवर सावध करण्यासाठी लार्म प्रणाली तयार केली जाईल. मुंबईसारख्या मोठ्या शहराच्या पुनर्वसनासाठी एक व्यापक, सर्वसमावेशक आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन आवश्यक आहे.

मुंबई शहर पाण्याखाली गेल्यास, महाराष्ट्रात पर्यायी बंदरे म्हणून विकसित होण्याची क्षमता असलेली काही ठिकाणे आहेत. महाराष्ट्रातील विविध ठिकाणांचा भौगोलिक आणि आर्थिक दृष्टिकोनातून विचार करता, खालील बंदरे पर्याय म्हणून विचारात घेतली जाऊ शकतात:

१. नवी मुंबई पोर्ट (जेएनपीटी) - जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) हे भारतातील सर्वात मोठे कंटेनर पोर्ट आहे. हे मुंबईच्या जवळ असल्याने, मुंबईवरील भार कमी करण्यासाठी त्याचा विकास वाढवला जाऊ शकतो.२. दाभोळ पोर्ट - रत्नागिरी जिल्ह्यातील हे बंदर मोठ्या जहाजांसाठी चांगले आहे. येथून खनिज आणि इतर वस्तूंची वाहतूक सहज करता येते.

३. रेडी पोर्ट - सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेडी पोर्ट हे वाहतूक आणि मासेमारीसाठी लोकप्रिय ठिकाण आहे. येथील भौगोलिक स्थितीमुळे याचे औद्योगिक दृष्टिकोनातून मोठे महत्त्व आहे.४. विजयदुर्ग पोर्ट - विजयदुर्ग हे ऐतिहासिक बंदर असून, येथे सागरी व्यापार वाढवण्याची क्षमता आहे. ५. मुरुड-जंजिरा पोर्ट - हे बंदर सागरी व्यापारासाठी सुलभ आहे आणि भविष्यात विकासाची क्षमता आहे. ही बंदरे स्थानिक उद्योगासाठी व नव्या व्यवसाय संधींसाठी विकसित होऊ शकतात.

## जेवल्यानंतर किती वेळाने ब्रश केले पाहिजे?

मुंबई: तोंडाचे आरोग्य चांगले राखणे नेहमी गरजेचे असते. यातील दुर्लक्ष आपल्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. अशातच जाणून घेऊया की रात्रीचे जेवण जेवल्यानंतर किती वेळाने ब्रश केले पाहिजे.

दातांची साफसफाई अतिशय गरजेची असते. दिवसातून दोनदा ब्रश करण्याचा सल्ला डॉक्टर देतात. रात्री झोपण्याआधी ब्रश केल्याने दातांना त्याचा फायदा होतो. मात्र अनेकजण रात्रीचे जेवण केल्यानंतर लगेचच ब्रश करण्यासाठी जातात. मात्र असे करणे अजिबात योग्य नाही.

तोंडाच्या आरोग्याबाबत थोडेसे दुर्लक्ष हानिकारक ठरू शकते. डॉक्टरांच्या मते जर खाण्यामध्ये आंबट फळे, ॲसिडिकसारख्या पदार्थांचा समावेश असेल तर तोंडाची पीएच लेव्हल कमी होते. यामुळे ॲसिडिटिक होतात. यामुळे दातांचे इनॅमल कमकुवत बनू शकते. अशातच जर खाण्यानंतर लगेचच दातांवर ब्रश केले जाते तर इनॅमल खराब होण्याचा धोका अधिक वाढतो.

तज्ज्ञांच्या माहितीनुसार जेवणानंतर अर्धा तास म्हणजेच ३० मिनिटानंतर ब्रश केले पाहिजे. इतक्या वेळात लार ॲसिड कमी होऊन इनॅमल्सला पुन्हा मिनरल्स बनण्याची संधी देते. जर तुम्ही रात्रीच्या जेवणानंतर ब्रश करण्यासाठी जात असाल तर सगळ्यात आधी पाण्याने चूळ भरा. अथवा पाणी प्या. यामुळे इनॅमल मजबूत होण्याची प्रक्रिया सुरू होते. ब्रश करण्यासाठी वेळच नव्हे तर योग्य पद्धतही गरजेची आहे. हलक्या हाताने, उभ्या पद्धतीने स्क्रबिंग चांगली असते. सॉफ्ट ब्रिसल्स वापरल्याने दातांचे इनॅमल खराब होत नाही. तज्ज्ञांच्या माहितीनुसार कमीत कमी दोन मिनिटे ब्रश केले पाहिजे. या दरम्यान दातांची सर्व लेयर कव्हर झाल्या पाहिजेत. तसेच जीभही साफ केली पाहिजे. कारण यामुळे बॅक्टेरिया वाढत नाही आणि तोंडाला दुर्गंधीही येत नाही.

## राशी भविष्य



राशीभविष्य

१२ नोव्हेंबर २०२४ (पीएसआय)

मेष: शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पूर्व
आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

वृषभ : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर
नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

मिथुन: शुभ रंग: केसरी: शुभ दिशा:उत्तर
वेळेत कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. मित्रांचे व सगे सोयऱ्यांचे सहकार्य मिळेल. निष्कारण वाद विवाद, तणाव टाळला पाहिजे. व्यापाराती योग्य निर्णय फायदेशीर राहील.

कर्क :शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम
मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

सिंह : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
जोखमीचे व जबाबदारीचे कामे सावधतेने करा. निष्कारण धावपळ करू नका. प्रयत्न करून आज यश कमी मिळेल. कौटुंबिक समस्यांची चिंता राहील.

कन्या :शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम
अति उत्साह आपल्याला नुकसान पोहचवेल. प्रवासाचा फायदा होणार नाही. अधिक खर्च करण्याची प्रवृत्ती सोडा. व्यापार मध्यम राहील.

तुळ: शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: पूर्व
कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

वृश्चिक: शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व
मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

धनु: शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पूर्व
कौटुंबिक संबंध मधूर राहतील. मान सन्मान वाढेल. भागीदारीचे अनेक नवीन प्रस्ताव मिळतील. अनोळखी व्यक्तीपासून सावध रहा. अडकलेला पैसा मिळेल.

मकर :शुभ रंग:पिवळा: शुभ दिशा:पश्चिम
आपली दयाळू प्रवृत्ती, उदारतेमुळे आपल्याला एक नवीन सुख देऊन जाईल. नवीन पद मिळण्याची शक्यता आहे. गुंतवणूकीच्या बाबतीत जागृत रहा. मुलांचे जीवन समाधानी राहील.

कुंभ: शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर
मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

मीन :शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:उत्तर
जीवनसाथीचे सहकार्य आपल्याला मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. प्रतिष्ठीत लोकांच्या भेटीमुळे आपल्या फायद्यात वाढ होईल. प्रवासात सावधानी बाळगा.

१२ नोव्हेंबरला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य, चंद्र, गुरू व मंगळाचा प्रभाव आहे. कुठल्याही समस्येचा उलगडा तुम्हाला तात्काळ होतो व तो सोडवण्यासाठी तुम्ही कामाला लागता. ज्ञानार्जनाची तुम्हाला आवड आहे व इतरांना तुम्ही त्यासाठी उद्युक्त करता. इतरांबद्दल तुम्हाला खूप सहानुभूती वाटते व त्यांची दु:खे कमी करण्यासाठी तुम्ही झटता. सत्कर्माचे फळ चांगलेच मिळणार अशी तुमची खात्री असते. ऐहिक प्रगतीबरोबर आध्यात्मिक प्रगती साधण्यासाठी तुम्ही प्रयत्न करता. धर्मग्रंथांचे वाचन, उपासना करता. इतरांची दु:खे दूर करतांना आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष्य होऊ देऊ नका. दान देखील सत्पात्री करा नाहीतर लोक चांगुलपणाचा फायदा उठवतील. किडनीच्या, मूत्राशयाच्या विकारापासून सावध रहा. तिखट पदार्थ, टोमॅटो, दूध प्रमाणाबाहेर खाऊ नका.

कार्यक्षेत्र : शिक्षण, न्यायदान, बँकिंग वगैरे क्षेत्रात तुम्ही तुमच्या क्षमतेचा पुरेपूर उपयोग करून घेऊ शकाल. जिथे जास्तीत जास्त लोकांच्या समस्या सोडवता येतील अशा संस्थात म्हणजे महापालिका, इस्पितळे, सहकारी कारखाने व पतपेढ्या यामध्ये महत्वाचे पद लवकर मिळेल. धार्मिक व संस्कारदायी पुस्तकांची प्रकाशने, प्रबोधनपर वाङ्.मयाचे लेखन, मुद्रण व पत्रकारिता ही क्षेत्रेही अनुकूल ठरतील.

प्रणयी जीवन : प्रियकर निवडतांना त्याच्या रूपसौंदर्यापेक्षा तुम्ही त्याच्या गुणांना सात्विक वृतीला जास्त महत्व देता. त्याला आपल्यासारखीच सामाजिक बांधिलकीची जाणीव असावी अशीही तुमची अपेक्षा असते. शरीरसुखामागे धावणाऱ्या व्यक्ती तुम्हाला आवडत नाहीत. एप्रिल २१ ते मे २० मधील व्यक्ती टाळा. नोव्हेंबर २३ ते डिसेंबर २० मधील व्यक्ती निवडा.

वर्षफळ : प्रवासावर करावा लागणारा खर्च हे या वर्षाचे वैशिष्ट्य ठरेल. खूप दूरचे प्रवास कराल. परदेशगमनाचे योग आहे. डिसेंबर जानेवारी मध्ये मोठी कर्जे काढण्याची प्रवृत्ती टाळा. फेब्रुवारी मार्च मध्ये गैरसमजाने वैवाहिक जीवन गढुळ होईल. एप्रिल मे मध्ये उच्चशिक्षण वा विदेशी कंपनीत प्रवेश मिळेल. जून जुलै मध्ये आर्थिक प्राप्तीचा उच्चांक गाठाल. ऑगस्ट सप्टेंबर मध्ये कार्यालयात भरीव कामगिरी करू शकाल.

महत्वाचे वर्ष : ३, १२, २१, ३०, ३९, ४८, ५७, ६६.

भाग्यरत्न : पुष्काराज

याच तारेखेची व्यक्ती : सेनापती बापट, एस.एस. जोशी, सलीम अली

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# देगलूर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांनी निवडणूक खर्चात पारदर्शकता ठेवावी : ए. गोविंदराज

देगलूर (प्रतिनिधी): विधानसभा निवडणुकीत उमेदवारानी खर्चामधे पारदर्शकता ठेवावी असे आवाहन विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ कार्यक्रम अंतर्गत ९०-देगलूर मतदार संघातील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचा निवडणूक खर्च संनियंत्रणाच्या अनुषंगाने उमेदवारांनी दाखल करावयाच्या दैनंदिन खर्चाच्या नोंद वहीची दुसरी तपासणी दि.११नोव्हेंबर सोमवार रोजी पार पडली.या वेळी

खर्च निरीक्षक ए. गोविंदराज उमेदवारांना संबोधित करीत होते.

मा.गोविंदराज व सहाय्यक निवडणूक खर्च निरीक्षक परमेश्वर माळी यांच्या अध्यक्षतेखाली सदरील दुसरी तपासणी देगलूर येथील तहसील कार्यालयात दि.११ नोव्हेंबर सोमवार रोजी झाली. त्यांनी प्रत्येक उमेदवारांना व्यवहारात पारदर्शकता ठेवावी .तसेच जाहिरात, वाहतूक, प्रचार साधन साहित्य व इतर यावरील खर्चा बाबतचा आढावा घेऊन तपासणी केली



मतदारसंघातील उमेदवारांची खर्च निरीक्षक यांच्यासमोर भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ७७ नुसार निवडणुकीच्या वेळेस प्रत्येक उमेदवार अथवा निवडणूक प्रतिनिधी द्वारे त्याला /तिला नामनिर्देशित करण्यात आले आहे त्या दिनांकापासून निवडणुकीच्या निकाल लागणाऱ्या दिनांका पर्यंत दोन्ही दिनांक धरून त्यांनी किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेला किंवा प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र तसेच अचूक हिशोब ठेवणे आवश्यक आहे. आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची आता पुढिल तृतीय तपासणी दि.१५ नोव्हेंबर २०२४ शुक्रवार रोजी सकाळी (१० ते ५ वा.) होणार आहे याबाबत उमेदवार व प्रतिनीधीस सुचना देण्यात आल्या सदर वेळेस अनुपस्थित राहणारे उमेदवारांना भारत निवडणूक आयोगाकडून निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार कार्यवाहीस पात्र असणार आहेत .

कायद्याचे आवश्यकतांचे अनुपालन करण्यास निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने कसूर केल्यास लोकप्रतिनिधित्व अधिनियम १५५१ कलम १०क अन्वये निवडणूक आयोगाकडून कार्यवाही करण्यात येईल असे ही यावेळी गोविंदराज निवडणूक खर्च निरीक्षकांनी सूचीत केले. यावेळी निवडणूक खर्च नोडल अधिकारी, पथक प्रमुख तथा उपकोषागार अधिकारी एस. एस. रामोड, खर्च पथक प्रमुख तथा नोडल अधिकारी मनोहर ढेंगळे, कार्यकारी अभियंता गंगथडे ९०-देगलूर विधानसभा मतदारसंघ विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मिडीया कक्ष नोडल अधिकारी श्रीमती सुषमा मोहोड, सहाय्यक नरहरी कोलगाणे, प्रा.महेश कुलकर्णी व विठ्ठल चंदनकर, विजय शिकारे यांनी माहीती दिली.

# आलमला येथे निसर्गरम्य वातावरणात विधानसभा निवडणूक प्रशिक्षण २०२४ संपन्न

औसा प्रतिनिधी : तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शैक्षणिक संकूलात विधानसभा निवडणूक -२०२४ करीता औसा विधानसभा मतदार संघातील सर्व मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी यांना दि.११ व १२ नोव्हेंबर २०२४ रोजी द्वितीय प्रशिक्षण निवडणूक निर्णय अधिकारी-२३९ औसा विधानसभा मतदार संघ अविनाश कोरडे व सहाय्यक निवडणूक अधिकारी- घनश्याम अडसूळ यांच्या उपस्थितीत देण्यात आले.

लोकशाहीच्या उत्सवाचा मतदान प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकारी, शिक्षक कर्मचारी यांनी तत्परतेने व पारदर्शीपणाने काम पहात दि.११ व १२ नोव्हेंबर २०२४ रोजी दोन दिवशीय प्रशिक्षण झाले. भारत निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक आयोग अधिकारी, महाराष्ट्र राज्य व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निर्देशानूसार आलमला येथील विश्वेश्वर शैक्षणिक संकूलातील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला व विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालय, आलमला येथे ०२ दिवशीय २३९ औसा विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व कर्मचारी यांना पीपीटी द्वारे व ईव्हीएमची माहिति देवून नाविण्यपूर्ण प्रशिक्षण देण्यात



आले. यामध्ये प्रत्यक्ष ईव्हीएम मशीन हाताळण्याची माहिती क्षेत्रीय अधिकारी व मास्टर ट्रेनर यांच्या माध्यमातून देण्यात आली. या प्रक्षिक्षणास मतदान केंद्रांध्यक्ष, मतदान अधिकारी असे एकूण १३७६ पैकी १३४७ हजर होते, तर २९ गैरहजर होते.

तसेच अभिरुप मतदान केंद्राचे नियोजन करुन सर्व मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व कर्मचारी यांना क्लासरुम ट्रेनींग पीपीटीद्वारे मतदान केंद्र कसे असावे हे दाखविण्यात आले. तसेच फॅसिलेशन सेंटर ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूल, आलमला येथे उभारण्यात आले होते. त्यामध्ये १०४६ कर्मचाऐयापैकी ८५४ कर्मचाऐयांनी प्रत्यक्ष मतदान केले.

या प्रसंगी लातूर जिल्हाचे निवडणूक निरीक्षक, ओडिसा येथील लक्ष्मीकांत पॅरेलाल प्रधान साहेबांनी प्रशिक्षणास भेट दिली. यावेळी उपविभागीय अधिकारी, औसा-रेणापूर तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी-२३९, औसा विधानसभा मतदार संघ - अविनाश कोरडे, तहसीलदार- औसा तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी- घनश्याम अडसूळ, अप्पर तहसीलदार कासारशिरसी - शिवाजी कदम, तहसीलदार -वर्षा मनाळे, गट विकास अधिकारी-औसा, युवराज म्हेत्रे, नायब तहसीलदार मुस्तफा खोरे, सुरेश पाटील, अजय पाटील, साहेबराव घोडके यांनी नेमून दिलेली कामे वेळेत पूर्ण केल्याने मतदान प्रशिक्षण शिबीर यशस्वी झाले.

या प्रशिक्षणास विश्वेश्वर संकुलातील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला व विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालय, आलमला या महाविद्यालयात संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्राचार्य प्रशांत धाराशिवे, प्रशासकीय अधिकारी योगेश धाराशिवे, प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, गोपाल दंडिमे, प्राचार्य डॉ. कैलास कापसे, प्राचार्या स्वाती कापसे, डॉ. सचिन हंगरगेकर व संस्थे अंतर्गत कार्यरत सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रशिक्षणास लागणा-या सर्व सोयी-सूविधा उपलब्ध करुन दिल्याबद्दल निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संस्थेचे कौतुक केले.

# एकजुटीने सर्वांनी निवडणूक प्रक्रियेत सहभागी व्हावे : क्रांती डोंबे

## दुसऱ्या प्रशिक्षणात ९५५ उपस्थिती तर ४५ अनुपस्थिती

देगलूर (प्रतिनिधी) : लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभेच्या निवडणुकीचा मतदानाचा टक्का वाढावा यासाठी सर्वजण उत्साहाने प्रयत्न करत आहात. मतदान प्रक्रिया ही लोकशाही मार्गाने सरकार निवडण्याची प्रक्रिया आहे. लोकशाहीचा उत्सव उत्साहात साजरा व्हावा यासाठी सर्वांनीच कुटुंबाचा भाग म्हणून या उत्सवात सहभागी होऊन सहकार्य करावे. व एकजुटीने निवडणुकीचे काम पूर्ण करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा बिलोलीच्या उपजिल्हाधिकारी श्रीमती क्रांती डोंबे यांनी केले.

देगलूर महाविद्यालयात १२ नोव्हेंबर रोज मंगळवार रोजी सकाळ व दुपार असे दोन टप्प्यात मतदान केंद्राध्यक्ष मतदान अधिकारी सहाय्यक



मतदान अधिकारी व इतर मतदान अधिकाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण टप्प्यातील पहिल्या दिवशीचे टप्पा पार पडले यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा देगलूर चे तहसीलदार भरत सूर्यवंशी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा बिलोली चे तहसीलदार गजानन शिंदे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा बिलोलीचे मुख्याधिकारी सतीश पुदाके, मनुष्यबळ विभागप्रमुख तथा नायब तहसीलदार आर जी चव्हाण, आचारसंहिता विभाग प्रमुख तथा गट विकास अधिकारी शेखर देशमुख, नायब तहसीलदार गिरीश सर्कलवाड, नायब तहसीलदार बालाजी मिठ्ठेवाड आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

दि. २० नोव्हेंबर रोजी नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व देगलूर बिलोली विधानसभेसाठी मतदान होत असून मंगळवारी दुसरे प्रशिक्षण पार पडले. मंगळवार व बुधवार या दोन दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षणात पहिल्या दिवशी दोन सत्रात घेण्यात आलेल्या या प्रशिक्षणात क्षेत्रिय अधिकारी, दोनशे केंद्राध्यक्षांसह,मतदान अधिकारी, इतर मतदान अधिकाऱ्यांची २०० टीमचे ०१ हजार मतदान अधिकारी व कर्मचारी पैकी ९५५ उपस्थित होते तर ४५ जणांची अनुपस्थिती होती.आज बुधवार रोजी दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण पार पडणार आहे. मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या सर्व केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांना तसेच कर्मचाऱ्यांना टपाली मतपत्रिका वाटप करून टपाली मतदान करून घेण्यात येत आहे. मतदानापासून कुणीही वंचित राहणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी अशी आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती क्रांती डोंबे यांनी केले आहे.

# विनापरवानगी बल्क व्हाईस मेसेज टाकणाऱ्या तीन उमेदवारांना नोटीस

नांदेड(प्रतिनीधी ):निवडणूक काळामध्ये उमेदवारांनी प्रचार साहित्याची पुर्वपरवानगी घेणे निवडणूक आयोगाने बंधनकारक केले आहे. व्हिडीओ, ऑडिओ, बल्क मेसेज, ऑडिओ मेसेज, प्रचाराची रिल, छोटे व्हिडीओ याची परवानगी माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती (एमसीएमसी) कक्षाकडून घ्यावी लागते. मात्र अशा पध्दतीची परवानगी न घेणाऱ्या तीन उमेदवारांना नांदेड उत्तर चे निवडणूक निर्णय अधिकारी ललीतकुमार वऱ्हाडे यांनी नोटीस बजावली आहे.

माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती जिल्ह्यामध्ये स्थापन झाली आहे. प्रसारमाध्यमाचा वापर करताना उमेदवारांनी निवडणूक आयोगाचे निर्देश पाळणे आवश्यक आहे. यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार एमसीएमसीची परवानगी आवश्यक आहे. मात्र बल्क व्हाईस मेसेज पाठविणारे निवडणुकीतील उमेदवार श्रीमती संगीता विठ्ठल पाटील, देशमुख मिलींद उत्तमराव, बालाजी देविदास कल्याणकर यांनी परवानगी न घेताच बल्क मेसेज प्रसारित केल्याचे निर्देशास आले आहे.

यासंदर्भात जिल्हा माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती, नांदेड यांनी याबाबतीत निवडणूक निर्णय अधिकारी ८६-नांदेड उत्तर यांनी अवगत केले. त्यामुळे दि. १२ नोव्हेंबर रोजी या संदर्भातील नोटीस बजावण्यात आली आहे. एमसीएमसी कक्षाची परवानगी न घेता प्रसारित केलेल्या बल्क एसएमएस संदेशासाठी २४ तासाच्या आत खुलासा करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत यांनी उमेदवारांनी मुक्त वातावरणात प्रचार प्रसार करावा, मात्र नियमाचा भंग होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. ईलेक्ट्रानिक्स फॉरमॅटमधील सर्व ऑडिओ, व्हिडीओ साहित्याला परवानगी आवश्यक आहे. तसेच बल्क एसएमएस, व्हाईस एसएमएस प्रसारित करणाऱ्या कंपन्यानी उमेदवारांकडून परवानगी असल्याशिवाय प्रसारण करु नये, असेही स्पष्ट केले आहे. मुद्रित माध्यमाच्या जाहिरातींसाठी मात्र शेवटच्या दोन दिवसात परवानगी घ्यावी लागेल असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

पान १ वरून

## मोदींना ...

करत असलेल्या प्रयत्नांचा भाग म्हणून हा दौरा महत्त्वाचा होता. पंतप्रधान मोदी आणि तुमच्यात काय साम्य आहे, असा प्रश्न मोबियस यांना विचारण्यात आला होता. त्यावर ते म्हणाले की, आम्ही नेहमी पुढचा विचार करतो. मागचा नाही. त्याचबरोबर जागतिक स्तरावर जे घडत आहे त्याबाबत आम्ही दोघेही आशावादी आहोत.

अर्थव्यवस्थेवर काय म्हणाले मोबियस?

भारतीयांची सर्जनशील प्रेरणा हा अर्थव्यवस्थेमधील महत्त्वाचा घटक आहे असे मोबियस यांनी स्पष्ट केले. भारताचा प्रदीर्घ इतिहास आणि सांस्कृतीक विविधता हे देशाचे एक बलस्थान आहे. भारतामधील प्रत्येक राज्याला स्वत:ची भाषा आणि संस्कृती आहे, असेही त्यांनी सांगितले.

## महायुतीत...

असे अजित पवार यांनी म्हटले होते. त्यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही राणा दाम्पत्याचे कान टोचले आहेत.

महायुती मजबूतीने लढत आहे. महायुतीत कोणीही मिठाचा खडा टाकण्यात काम करू नका. मी राणा परिवारालाही सांगतो की, तुम्ही महायुतीचे घटक आहात. महायुतीत सरकार तुमच्या पाठीशी उभं राहिले आहे. सरकार आणण्यासाठी कॅप्टन अभिजीत अडसूळदेखील आपल्याला हवे आहेत. म्हणून आपण देखील महायुतीची शिस्त पाळली पाहिजे. महायुतीत राहायचे आणि महायुतीच्या विरोधात काम करायचे हे कोणी करता कामा नये. मुख्यमंत्री म्हणून मी हे आवाहन करत आहे असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले.

दर्यापूर मतदार संघाचे उमेदवार अभिजीत अडसूळ यांच्यामध्ये काम करण्याची तळमळ आहे. अभिजीत अडसूळ यांना कॅप्टन म्हणणा-यांना कायमचे बाहेर पाठवून द्या. न थकता काम करणा-या अभिजीतला या ठिकाणी विजयी करायचे आहे. अमरावती जिल्ह्याच्या विकासासाठी आम्ही अनेक निर्णय घेतले आहेत. अमरावती जिल्ह्यात संत्रा इस्टेट उभारत आहे. वैनगंगा नळगंगा प्रकल्प या दोन प्रकल्पाला सरकारने मान्यता दिली आहे. कॅप्टन अभिजीत अवश्य विधानसभेत पोहोचल्यास जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल. लाडकी बहीण योजना सुपरहिट झालेली आहे. यामुळे विरोधकांची पायाखालची वाळू घसरलेली आहे. या लाडक्या बहिणीचे महायुतीचे सरकार पुन्हा आणणार आहेत. मात्र सावत्र व दृष्ट भावांपासून सावध राहा असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

## किरकोळ...

या महागाईमध्ये येत्या काळात कांदा चांगलीच फोडणी देणार आहे. पुण्यात अनेक ठिकाणी जुना कांदा ८० रुपये तर नवा कांदा ६०-७० रुपयांना किलो विकला जात आहे. दिल्लीत कांद्याचा दर ८० रुपयांवर गेला आहे. यामुळे येत्या काळात कांद्याचा दर ग्राहकांना चांगलाच रडवणार आहे. यातच इराण इस्रायलवर हल्ल्याची तयारी करत आहे. जर युद्ध भडकले तर कच्च्या तेलाचे दरही भडकणार आहेत.

## एसटीच्या बसेस...

धावणार असल्याने नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अर्थात नागरिकांच्या सोयीसाठी एसटीने गाड्यांचे योग्य ते नियोजन केले असेलच. परंतु तरीही नागरिकांनी गाड्यांची संख्या आणि वेळ पाहून प्रवास करणे जास्त सोयीचे ठरेल. जेणेकरून वेळेत मतदान होईल आणि आपले पुढचे वेळापत्रकही कोलमडणार नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, १ हजार खासगी स्कूल बस आणि ४०० बेस्ट बसदेखील निवडणूक प्रक्रियेसाठी वापरण्यात येणार आहेत.

दरम्यान, एसटीच्या ताफ्यात सध्या स्वमालकीच्या १३ हजार ३६७ बस आहेत. त्यातील ९ हजार २३२ गाड्या राज्यातील ३१ विभागांना निवडणुकीच्या कामकाजासाठी देण्यात येणार आहेत.

एसटीला होणार आर्थिक फायदा

लोकसभा निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेसाठीही एसटी बस धावल्या होत्या. त्यावेळी मार्ग आणि किलोमीटरप्रमाणे भाडे ठरविण्यात आले. त्यातून एसटीला एका बससाठी जवळपास २४ ते ३० हजार रुपये उत्पन्न मिळाले. आता विधानसभा निवडणुकीतही याचप्रमाणे भाडेआकारणी होणार आहे, त्यामुळे एसटीला तसाच फायदा होण्याची शक्यता आहे.

## मल्लिकार्जुन खरगे...

पाटील, उदगीर मतदारसंघाचे सुधाकर भालेराव, औसा मतदार संघाचे दिनकर माने यांच्या प्रचारार्थ खरगे यांच्या विशाल सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही सभा बुधवारी (दि.१३) सकाळी लातूर शहरातील दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आली आहे. या सभेस महाविकास आघाडीचे राज्य पातळीवरील प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. मतदारांनी मोठ्या संख्येने या जाहीर सभेस उपस्थितीत राहण्याचे आवाहन ॲड. किरण जाधव, अध्यक्ष लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी व श्रीशैन उटगे अध्यक्ष जिल्हा काँग्रेस कमिटी व काँग्रेस पक्षाच्या सर्व सेलच्या वतीने करण्यात आले आहे.

## हक्काचा साखर...

नागटिळक, सतीश आंबेकर, अनंत चव्हाण, वैभव सापसोड, वसंत करमुडे, गोपाळ पाटील, सुरज शिंदे, बापूराव चांमले, विजय काळे, साहेबराव मुळे, विजयकुमार मलवाडे, भैरवनाथ पिसाळ, प्रताप पाटील, पांडुरंग बालवाड, अजय गुडे, रशीद पठाण, ललिता कांबळे, लता भोसले, अनुसया फड, जनाबाई साखरे, शीला आचार्य, सुनिता माडजे योगीराज साखरे यांच्यासह अनेकांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने अडचणीत, संकटात सापडत असलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केलेल्या आग्रहाच्या मागणीमुळेच श्री संत गोपाळ बुवा महाराज शुगर अँड फूड इंडस्ट्रीजच्या माध्यमातून साखर कारखान्याची उभारणी करण्यात आली. कारखाना उभारणीचे काम प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहता यावे यासाठीच रोलर पूजनासाठी सर्वांना निमंत्रित करण्यात आले असल्याची माहिती देऊन चेअरमन राजेश कराड म्हणाले की, या कारखान्याचे दिवाळी पूर्वीच काम होणे अपेक्षित होते मात्र यावर्षी सतत चांगला पाऊस झाल्याने कारखान्याची कामे वेळेत पूर्ण झाली नाहीत तरीही डिसेंबर अखेर कारखान्याचे प्रत्यक्ष गाळप सुरू होईल. हा कारखाना प्रतिदिन सोळाशे टन गाळप क्षमतेचा आहे गरजेनुसार टप्प्याटप्प्याने गाळप क्षमता वाढवण्याचे नियोजन उभारणीत करण्यात आले आहे.

भादा सर्कल सह लातूर - रेणापूर तालुक्यातील शेतकरी ऊस उत्पादकांना न्याय देण्यासाठी त्यांच्या हक्काच्या स्वप्नातील कारखाना उभा राहिला असून या कारखान्याचा निश्र्चितपणे इतरांपेक्षा अधिक ऊसाला भाव असेल. उसाचे वजन कुठेही करून आणले तरी कारखान्याच्या वजन काट्यात फरक दिसणार नाही शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक केली जाईल, सर्वांना सन्मानाची वागणूक दिली जाईल असेही राजेश कराड यांनी बोलून दाखवले.

यावेळी बोलताना अँड. बळवंतराव जाधव म्हणाले की, कराड कुटुंब हे कुण्या एका जातीचे नाहीत तर शेतकरी हीच त्यांची जात आहे. शेतकऱ्याचा स्वाभिमान जिवंत ठेवण्यासाठी संत गोपाळबुवा हा हक्काचा कारखाना उभा राहिला आहे. आता कुणाला भिण्याची गरज नाही आणि शेतकऱ्याला लुटणाऱ्यांना माफी नाही सहकारी साखर कारखाने शेतकऱ्यांच्या मालकीचे कारखाने असताना नोकरासारखी वागणूक देत आहेत याबाबतीत योग्य तो निर्णय शेतकऱ्यांनी घेणे ही काळाची गरज आहे असेही त्यांनी बोलून दाखविले.

प्रारंभी कार्यक्रमाची प्रास्ताविक करताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, साखर कारखाना उभा रहावा हा प्रत्येकाच्या मनातील विश्र्वास प्रत्यक्ष कारखान्याची उभारणी करून निर्माण केला. शेतकऱ्याच्या अडचणीचे उत्तर आज डोळ्यासमोर दिसत आहे. हा कारखाना कोणाच्या मालकीचा नसून शेतकऱ्याच्या हक्काचा आहे. या कारखान्यातून शेतकऱ्याच्या हिताचे न्यायाचे काम होईल. प्रत्येक शेतकरी आमचा परिवार आहे विश्र्वासाचा सूर्य उगवला असून आपण सर्वजण आशीर्वाद द्याल ही अपेक्षा असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

या कार्यक्रमात भागवत सोट, पद्माकर चिंचोलकर, दशरथ सरवदे, सुरज शिंदे, गोपाळ पाटील, भैरवनाथ पिसाळ, रशीदभाई पठाण, उत्तम पवार, अशोक भिसे यांच्यासह अनेकांनी आपल्या मनातील भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी महेंद्र गोडभरले यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास रेणापूर लातूर तालुक्यासह भादा सर्कल मधील गावागावातील वाडी वस्तीतील शेतकरी ऊस उत्पादक भागधारक तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कंधार-लोहा...

होईल, असेही बोलले जात आहे.

ऑक्टोबर २०२३ मध्ये एकनाथ पवार यांनी भाजपला राम-राम ठोकत शिवबंधन बांधले आणि लोहा विधानसभा मतदारसंघात प्रताप चिखलीकर यांच्याविरोधात एकनाथ पवार यांना उद्धव ठाकरे गटाकडून उमेदवारी देण्यात आली असून त्यांचा दांडगा जनसंपर्क कोणावर भारी पडणार हे पाहणे महत्त्वाचे आहे.

विद्यमान आमदार शामसुंदर शिंदे व त्यांच्या पत्नी आशाताई शिंदे हे दोघेही पती-पत्नी मतदार संघात सदैव कार्यरत असल्याने यांना सर्वच स्तरातील मतदार ओळखतात. त्यांच्या मागील कामांचा आढावा घेताना लोकं दिसत आहेत. कंधार-लोहा विधानसभा मतदार संघात आमदार शिंदे यांनी मागील पंचवार्षिकमध्ये कोट्यवधी रुपयांची कामे आणली. त्यामुळे त्यांच्या कामाची जोरदार चर्चा आहे. त्याचप्रमाणे लोहा मतदारसंघ शेकापचा गड राहिला असून मतदारांचा कल स्थानिक उमेदवाराकडे दिसून येत आहे. भाजपचे माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांना लोहा विधानसभेची उमेदवारी मिळविण्यासाठी कमळ सोडून राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ हातावर बांधून घ्यावे लागले. साडेतीन दशकांच्या राजकीय जीवनातील चिखलीकर यांचे हे सहावे पक्षांतर आहे.

चिखलीकर यांनी लोहा कंधार विधानसभा मतदार संघातून दोन वेळेस प्रतिनिधित्व केले. काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी आणि भाजप असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर कंधार लोहा विधानसभेची वाट धरली.

## केंद्रीय...

सरकार येणार असून राज्यातील गावांचा विकास,गरीब व शेतकऱ्यांचा विकास साधण्यासाठी हे सरकार नव्या जोमाने कामाला लागणार आहे. महायुती सरकारला बळ देण्यासाठी लातूरच्या प्रतिनिधी म्हणून डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करत विधानसभेत पाठवा.

लातुरकरांची सेवा करण्याची संधी त्यांना द्या,असे आवाहनही नितीन गडकरी यांनी केले.

यावेळी माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, माजी शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे,स्थायी समितीचे माजी सभापती ड.दीपक मठपती, शैलेश गोजमगुंडे,भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्यासह भाजपा आणि महायुतीच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## मतदारांचा...

मी दलित असल्यामुळे माझी पिळवणूक झाली.आमदारापेक्षा खासदार पद मोठे असतांनाही केवळ मी दलित म्हणुन मला आमदारांनी वेळोवेळी दमदाटी करत मला मतदारसंघात येण्यास रोखले असा आरोप माजी खासदार सुधाकर श्रृंगारे यांनी व्यक्त केला.यांचा बदला घेण्यासाठी लोकसभेच्या मताधिक्यापेक्षा जास्तीचे मते अभय साळुंके यांना द्यावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

पुतण्याने धोका दिला...... तुम्ही देवु नका..... अशोकराव पाटील यांची भावनिक साद

सद्यस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश करणाऱ्याची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.गेल्या दहा वर्षांत निलंगा मतदारसंघातील जनतेला खुप त्रास सहन करावा लागला.या त्रागातुन मुक्त होण्यासाठी बदल हवाय.मला माझ्या पुतण्या नी धोका दिला...आता अभय मी तुम्हाला (राजकीय) पुतण्या मानतो पण मला धोका होवु नये अशी भावनिक साद अशोकराव पाटील निलंगेकर यांनी माजी मंत्री अमित देशमुख यांच्या उपस्थितीत घातली.मी तीस वर्षापासून राजकारण करतो. काँग्रेसची संस्कृती मला माहिती आहे.तयामुळे पक्ष मला प्रदेशाध्यक्ष पदही देवु शकतात आणि सर्वजण माझ्या हाताखाली काम करतील पण याची जबाबदारी अमित देशमुख घेतील हे सांगताना मात्र प्रदेशाध्यक्ष होण्याची इच्छा व्यक्त केली.

जनसेवक म्हणून सेवा करीन....अभय साळुंके

मी पद नसताना ही तुमच्या अडीअडचणीला धावुन आलोय.. आता पक्षाने मला उमेदवारी दिली असुन तुम्ही मला मतदान करुन विजयी करा.मला दुप्पटीने काम करण्याची संधी द्या.जनसेवक म्हणून मी अविरत सेवेत राहीन असे अभिवचन अभय साळुंके यांनी मतदारांना दिले.

## संभाजीरावाना...

नेतृत्व करणाऱ्यांनी मतदारसंघासाठी केले तरी काय ? असा प्रश्न उपस्थित केला. हैबतपूरकर महाराजांनी सकारात्मक परिवर्तनात युवकांनी सहभागी होवून डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर यांना मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी डॉ.अर्चनाताई पाटील चाकुरकर यांनी उपस्थित युवक युवतींसोबत मनमोकळा संवाद साधला.त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत विद्यार्थ्यांची मने जिंकली.सांदिपनी कॅम्पस मध्येही विद्यार्थी व प्राध्यापकांशी संवाद साधत ताईंनी सर्वांचे मनोगत जाणून घेतले. या संवाद बैठकीस एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय,सांदिपनी टेक्निकल कॅम्पसचे विद्यार्थी, प्राध्यापक मोठया संख्येने उपस्थित होते.

## संभाजीरावाना...

बदलता येत नाहीत.तरीही काँग्रेसकडून आरोप केला जातो. काँग्रेसने संविधान बदलाबाबत बोलणे म्हणजे मचोराच्या उलट्या बोंबाफ आहेत.आणीबाणीच्या काळात काँग्रेसने संविधानाच्या कशा चिंधड्या उडवल्या हे आपण पाहिले आहे.भाजपा मुस्लिम विरोधी असल्याचा प्रचार केला जातो परंतु पक्षाने कुठलीही योजना राबवताना कधीही जातीपातीचा विचार केला नसल्याचेही नितीन गडकरी यांनी सांगितले.

आ.संभाजीराव पाटील निलंगेकर हे स्वतःच्या ताकदीवर जिल्ह्याच्या व मतदारसंघाच्या समस्या सोडविणारे प्रभावी आमदार आहेत.त्यांच्या पाठीशी राहत प्रचंड मतांनी निवडून द्या, असे आवाहनही गडकरी यांनी केले.ग्रामीण क्षेत्र विकासामध्ये आ.संभाजीराव पाटील यांचे काम मोठे आहे.अक्कांनीही लोकसभेत प्रतिनिधित्व करताना विविध प्रश्न मांडून त्यांची सोडवणूक करून घेतली.लातूर शहरातील महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा हलवण्यास विरोध असताना आ.संभाजीराव पाटील शिष्टमंडळ घेऊन माझ्याकडे आले होते.हा पुतळा न हलविण्याच्या सूचना आ. निलंगेकर यांच्यामुळेच आपण दिल्याचेही गडकरी म्हणाले.

## उदगीर नगर परिषद कार्यालय, जि.लातूर
(नाहरकत विभाग)

जा.क्र.उनप./नाहरकत वि./काvि/२५८४/२०२४ दिनांक १२/११/२०२४

आपणास कळविण्यात येते की, श्री. अक्षय सुनिल पोतदार, रा. उदगीर यांनी श्री. विवेक राजकुमार चणगे यांची मिळकत क्र. ५-१-२०२ जुना व ५-१-२३३ नवीन भाजी मार्केट रोड, उदगीर येथील क्षेत्र ३३.४५ चौ.मी. व श्री. अभिषेक उमाकांत चणगे व प्रसाद उमाकांत चणगे यांची मिळकत क्र. ५-१-२३३/१ भाजी मार्केट रोड, उदगीर येथील क्षेत्र ३३.४५ चौ.मी. असे एकुण ६६.९० चौ.मी. क्षेत्रफळावर बियर बार ॲण्ड रेस्टॉरंट चालवणार आहेत या करीता या प्रकरणी कोणाची हरकत असल्यास वृत्तामानपत्रात छापुन आलेल्या दिनांकापासुन सात (७) दिवसात या कार्यालयास लेखी हरकत दाखल करावी. मुदतीनंतर हरकत स्वीकारली जाणार नाही.

तरी सबब माहितीस्तव.

उपमुख्याधिकारी
नगर परिषद, उदगीर

## जाहिरनामा
### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ११७/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार दत्तात्रय पि. वामनराव बिरादार रा. अचवला ता.देवणी जि.लातूर ज्यापेक्षा अर्जदाराचे वडील नामे वामन दत्तु बिरादार हे दिनांक २३/०२/२०२४ रोजी मौजे अचवला ता.देवणी जि.लातूर या ठिकाणी मयत झाले असून ते मौजे अचवला ता.देवणी जि.लातूर येथील रहिवाशी होते. त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | फुलाबाई वामन बिरादार | ५७ | पत्नी |
| २) | दत्तात्रय वामनराव बिरादार | २५ | मुलगा |
| ३) | अनुसया रघुनाथ शिंदे | २१ | मुलगी |

अर्जदार दत्तात्रय पि. वामनराव बिरादार रा. अचवला ता.देवणी जि.लातूर हिने/याने या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक २७/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : ०१/१०/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) क.लिपिक — शिक्का — (पी.एम.नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## टि.सी. हरवली आहे

माझी राहूल नामदेव कांबळे या नावी इ. १० वी पासची टिसी व मार्कमेमो व कागदपत्र असलेली बॅग दि. ०५/११/२०२४ रोजी उदगीर ते लातूर बसस्टँड वर हरवली आहे.

जर कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.नं ७२१९४५७३६३

# माझी निवडणूक आता जनतेच्या हातात : क्रीडामंत्री संजय बनसोडे



**उदगीर (प्रतिनिधी)** गेली पाच वर्षे मी या भागातील जनतेचा लोकप्रतिनिधी म्हणून प्रामाणिकपणे सेवा केली आहे. मी केलेल्या कामाची दखल घेऊन मतदारसंघातील जनतेनेच माझी निवडणूक आपल्या हातात घेतली असल्याने मला आता कशाचीही भिती वाटत नाही. माझा माझ्या जनतेवर पूर्ण विश्वास असुन ते विरोधकांच्या भुल थापांना बळी न पडता उदगीरच्या विकासासाठी ते मला आशिर्वाद देतील असा विश्वास व्यक्त करून राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना.संजय बनसोडे यांनी विरोधक अफ्फ़वा पसरवीत असून त्याला कोणीही बळी पडू नये असे आवाहन केले.

उदगीर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार ना. संजय बनसोडे यांनी आपल्या गावभेट दौऱ्यात हैबतपुर, लोहारा, करडखेल, वायगाव, सताळा, शंभू उमरगा सह अनेक गावातील ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, माजी जि. प. सदस्य ॲड. बस्वराज पाटील कौळखेडकर, पंडित सूर्यवंशी, शिवशंकर धुप्पे, सुदर्शन मुंडे, शंकर रोडगे, सुनील केंद्रे, बाबासाहेब पाटील हेरकर, तुळशीराम बेंबडे, राज तवंडे, सुदर्शन माने, केशव कांबळे, दिलीप गायकवाड, गणराज जाधव, दत्ता बुरले, बाबुराव आंबेगावे, लक्ष्मण जाधव, युवराज कांडगिरे, आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना ना. संजय बनसोडे म्हणाले की, जनतेच्या आशिर्वादाने पाच वर्षांपूर्वी आमदार झालो , मंत्री झालो. या पाच वर्षात या पदाच्या माध्यमातून उदगीर मतदारसंघाच्या विकासाचा मास्टर प्लॅन तयार करून विकासापासून कोसोदूर असलेल्या मतदारसंघाचा चौफ्फ़ेर विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. कुठल्याही भागातील दळणवळण व्यवस्था मजबूत असली की विकास अधिक गतीने होतो हे लक्षात घेऊन या मतदारसंघात राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग व अंतर्गत रस्त्याचे जाळे निर्माण केले. प्रत्येक गावात घराघरात नळ देण्यासाठी प्रयत्न केला. आरोग्यासोबत सिंचनाची व्यवस्था करून शेतकऱ्यांच्या जीवनात अर्थिक क्रांती केली आहे. उदगीर जिल्हानिर्मिती साठी आवश्यक त्या सुविधा प्राप्त केल्या असून उदगीर जिल्हा केल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नसल्याचे सांगत ना. बनसोडे यांनी आपण सर्व जाती धर्माच्या लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगितले.

मी पाच वर्षे जे काम केलं त्या जोरावर मला मत मागण्याचा अधिकार असून आता माझी निवडणूक लोकांनीच हातात घेतली असल्याने मला विजयाची खात्री आहे असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी विविध गावात ना.संजय बनसोडे यांचे माता भगिनींनी औक्षण करुन विजयासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी विविध गावचे सरपंच, चेअरमन, महिला व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी हैबतपुर, लोहारा, करडखेल, महादेववाडी, करवंदी तांडा, करवंदी, शंभूउमरगा, वायगाव, सताळा, कुंभारवाडी, डिग्रस, गणेशवाडी, जंगमवाडी, हेर आदीसह विविध गावात भेटी दिल्या.

## जाहिरनामा
### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. १५७/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार नामे शरीफाबी भ्र. महेमुदसाब बौडीवाले, वय २० वर्षे, धंदा घरकाम, रा.वलांडी ता.देवणी जि.लातूर ज्यापेक्षा अर्जदाराचे पती नामे महेबुदसाब इमामसाब बौडीवाले हे दिनांक ०९/०३/२०२४ रोजी मौजे वलांडी ता.देवणी जि.लातूर या ठिकाणी मयत झाले असून ते मौजे वलांडी ता.देवणी जि.लातूर येथील रहिवाशी होते. त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | शरीफाबी महेमुदसाब बौडीवाले | ३० | पत्नी |
| २) | याखुबसाब महेमुदसाब बौडीवाले | ५० | मुलगा |
| ३) | खलीलसाब महेमुदसाब बौडीवाले | ४८ | मुलगा |
| ४) | तोलनबी दस्तगीर शेख | ५० | मुलगी |
| ५) | नासेमाबी मेहता शेख | ४५ | मुलगी |

अर्जदार नामे शरीफाबी भ्र. महेमुदसाब बौडीवाले, वय २० वर्षे, धंदा घरकाम, रा.वलांडी ता.देवणी जि.लातूर हिने/याने या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certif-cate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक ०४/११/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : १६/१२/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) क.लिपिक — शिक्का — (पी.एम.नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा
### २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, अहमदपुर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५२९/२०२४ नि.क्र. ०७

ज्यापेक्षा नामे दिगंबर शामराव सावरगावे हे दिनांक २३.०४.२०११ रोजी सुंदरबाई भ्र. दिगंबर सावरगावे ही दिनांक १२.०८.२००७ रोजी जगळपुर (बु) ता.जळकोट जि.लातूर येथे मयत झाले आहेत व अर्जदार नागनाथ दिगंबर सावरगावे यांनी खालील नमुद ०४ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| अनु. क्र. | वारसदारांचे नाव | वय | मयताशी असलेले संबंध |
|---|---|---|---|
| १. | नागनाथ पि. दिगंबर सावरगावे | ४५ | मुलगा |
| २. | गजानन पि. दिगंबर सावरगावे | ३९ | मुलगा |
| ३. | सुनंदा भ्र. पांडूरंग गोंड | ५० | मुलगी |
| ४. | लक्ष्मीबाई भ्र. तानाजी बिरादार | ४७ | मुलगी |

अर्जदार यांना दिगंबर शामराव सावरगावे आणि सुंदरबाई भ्र. दिगंबर सावरगावे या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू दिगंबर शामराव सावरगावे आणि सुंदरबाई भ्र. दिगंबर सावरगावे याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/१०/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १३/११/२०२४

डी.ए.कांबळे, कनिष्ठ लिपीक, ३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, अहमदपुर

एम.एल.सुत्राळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर,अहमदपुर

## जाहिरनामा
### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ६४/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार प्रभाकर पि. विश्वनाथ बिरादार, रा. ईस्मालवाडी, ता.देवणी जि.लातूर ज्यापेक्षा अर्जदाराची पत्नी नामे कमलाबाई प्रभाकर बिरादार हे दिनांक ०४/०८/२०२३ रोजी द अर्थ सेवियर्स फाउंडेशन, बंधवारी गांव, टेरी गोल्फ कोर्स जवळ गुरुग्राम, हरियाणा या ठिकाणी मयत झाले असून ते मौजे ईस्मालवाडी ता.देवणी जि.लातूर येथील रहिवाशी होते. त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | प्रभाकर पि. विश्वनाथ बिरादार | ७७ | पती |

अर्जदार प्रभाकर पि. विश्वनाथ बिरादार, रा. ईस्मालवाडी, ता.देवणी जि.लातूर हिने/याने या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक ०७/१०/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : १८/११/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) क.लिपिक — शिक्का — (पी.एम.नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा
### मा.जे.सी. गुप्ता, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ९०९/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Dashrath S/o. Ganubuwa Aarne, हे दिनांक २०.०५.२०२१ रोजी Dongarshelki Tq.Udgir Dist.Latur मयत झाले आहेत व अर्जदार

1. Kaushalyabai W/o Dashrath Aarne, Age 56 yrs, Occu. H.H.
2. Raghuveer S/o. Dashrath Aarne, Age 53 yrs, Occu. Agri,
3. Gangadhar S/o. Dashrath Aarne, Age 50 yrs, Occu. Agri,
4. Bharat S/o. Dashrath Aarne, Age 46 yrs, Occu. Agri,
5. Padmakar S/o. Dashrath Aarne, Age 35 yrs, Occu. Agri,

R/o. Dongarshelki Tq.Udgir Dist.latur

यांनी खालील नमुद ५ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. | Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1. | Kaushalyabai W/o Dashrath Aarne, | 56 | Wife |
| 2. | Raghuveer S/o. Dashrath Aarne | 53 | Son |
| 3. | Gangadhar S/o. Dashrath Aarne | 50 | Son |
| 4. | Bharat S/o. Dashrath Aarne | 46 | Son |
| 5. | Padmakar S/o. Dashrath Aarne | 35 | Son |

अर्जदार याने Dashrath S/o. Ganubuwa Aarne या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Dashrath S/o. Ganubuwa Aarne याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५/११/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २१/१२/२०२४

संतोष डी. शिंदे, कनिष्ठ लिपीक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

एम.एल.सुतराळे, सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर


उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो












## उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| | | | |
|---|---|---|---|
| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |

| | |
|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव

# दुसऱ्याच्या प्रचाराचे गाणे
## वापरणाऱ्या उमेदवारावर गुन्हा दाखल

नांदेड(प्रतिनीधी ): विधानसभा निवडणुकीमध्ये लोहा मतदारसंघात एका उमेदवाराने दुसऱ्या उमेदवाराचे गाणे वापरल्यासंदर्भात लोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रचार साहित्यासाठी माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीची (एमसीएमसी) परवानगी आवश्यक आहे. मात्र ही परवानगी तर घेतलीच नाही उलट नामसाधर्म्य असलेल्या उमेदवारांचे गाणे वापरले तसेच प्रचारात लोकांची दिशाभूल केली. त्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आशाबाई श्यामसुंदर शिंदे यांचे उमेदवार प्रतिनिधी प्रमोद एकनाथ शिंदे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी ८८-लोहा यांना यासंदर्भात तक्रार दिली आहे. लोहा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाच्या आशाबाई श्यामसुंदर शिंदे निवडणूक रिंगणात आहेत. त्यांच्याच नावाशी साधर्म्य असणाऱ्या अन्य अपक्ष महिला उमेदवार आशाताई श्यामसुंदर शिंदे यांनी शेकापच्या आशाबाई यांच्या प्रचार गीताची कॉपी केली असल्याची तक्रार करण्यात आली आहे. या तक्रारीमध्ये श्यामसुंदर शिंदे यांनी अपक्ष महिला उमेदवार आशाताई श्यामसुंदर शिंदे हे प्रचार गीत आणि आमचे नेते कै. भाई केशवराव धोंडगे, गुरुनाथ कुरुडे यांचे छायाचित्र प्रचारात वापरत असून गाडी क्र. एमएच २६ एडी ९२८६ महिंद्रा बोलेरो व अन्य गाड्यांद्वारे अपप्रचार करीत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. यासंदर्भात निवडणूक निर्णय अधिकारी लोहा यांनी माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीकडून अहवाल घेतला होता. अपक्ष उमेदवार आशाताई श्यामसुंदर शिंदे निशाणी ट्रक यांनी कक्षाकडून जाहिराती ईलेक्ट्रॉनिक माध्यमाकडून प्रसारित करण्यास परवानगी घेतली नसल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे प्रचार गाणे विनापरवानगी वापरणे, नेत्यांचे चेहरे व व्हिडीओ प्रचारासाठी वापरणे व त्याद्वारे मतदारांची दिशाभूल करणे यासंदर्भात तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानुसार भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १%१, कलम १%४ व कलम २२३ अंतर्गत अज्ञात वाहनचालकाच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

***

# नवा ट्विस्ट! पीसीबीच्या पायाखालची सरकणार जमीन; पाकिस्तानात नाही... या देशात होणार चॅम्पियन्स ट्रॉफी?

मुंबई,-पाकिस्तान २०२५ चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद भूषवत आहे, परंतु ही स्पर्धा पाकिस्तानमध्ये होणार की नाही हे अद्याप निश्चित झालेले नाही. चॅम्पियन्स ट्रॉफीचे संभाव्य वेळापत्रक समोर आले आहे. पाकिस्तानने आयसीसीला पाठवलेल्या ड्राफ्ट वेळापत्रकानुसार भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना लाहोरमध्ये होणार आहे. पण टीम इंडिया कोणत्याही परिस्थितीत पाकिस्तानला जाणार नसल्याचे बीसीसीआयने आयसीसीला स्पष्ट केले आहे. आता या प्रकरणात एक नवीन अपडेट समोर आले आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, आयसीसीने भारताच्या हायब्रिड मॉडेलच्या ऑफरवर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाकडून उत्तर मागितले आहे. खरंतर, बीसीसीआयने सुरक्षेच्या कारणास्तव टीम इंडियाला पाकिस्तानात पाठवण्यास भारत सरकारने नकार दिल्याचे स्पष्ट केले आहे. अलीकडेच पाकिस्तानमध्ये बॉम्बस्फोट झाला होता, त्यानंतर भारतीय संघ पाकिस्तानात जाणे जवळपास अशक्य झाले आहे.

पाकिस्तानचा इतिहास पाहिला तर टीम इंडियाने तिथे न गेलेलेच बरे आहे. मात्र, पाकिस्तान भारताला चॅम्पियन्स ट्रॉफी खेळण्यासाठी सातत्याने विनंती करत आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी हायब्रिड मॉडेलमध्ये आयोजित करण्याबाबत भारताने आयसीसीशी चर्चा केल्याचे वृत्त आहे, आयसीसीने याबाबत पीसीबीकडून उत्तर मागितले आहे.

पण आता मोठा ट्विस्ट आला आहे. पाकिस्तानने भारताची हायब्रीड मॉडेलची ऑफर स्वीकारली नाही तर संपूर्ण स्पर्धा दक्षिण आफ्रिकेत खेळवली जाऊ शकते, असे अनेक अहवालांमध्ये म्हटले आहे. जर पाकिस्तानने भारताची विनंती मान्य केली आणि ही स्पर्धा हायब्रीड मॉडेलमध्ये आयोजित केली. तर टीम इंडिया आपले सामने दुबईत खेळेल. असे अनेक अहवालांमध्ये म्हटले आहे. आता हे स्पष्ट झाले आहे की भारत समोर आणि पाकिस्तान हरला आहे.

# भाजीपाल्याच्या दरात वाढ

मुंबई : प्रतिनिधी- राज्यात निवडणुकांच्या तोंडावर भाज्यांचे भाव वाढत आहेत आणि ही महागाई शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरू शकते. दिवाळीनिमित्त कमी झालेले फळांचे आणि पालेभाज्यांचे दर आता वाढायला सुरुवात झाली आहे. सध्या किरकोळ बाजारात कांदा ८० रुपये किलो दराने विकला जात आहे. नवीन कांद्यांचे दर वाढले असून जुन्या कांद्याच्या विक्रीत वाढ झाल्याने कांद्याच्या दरात काहीशी वाढ झाली आहे.

मागच्या आठवड्यात बाजार समितीमध्ये कांद्याचा दर १८ ते ४८ रुपये किलो दरम्यान होता. आता तोच कांद्याचा दर ३५-६२ रुपये किलोवर पोहोचला आहे. किरकोळ बाजारात कांदा ७५-८० रुपये दराने विकला जात आहे. तसेच लसूण बाजारात ३५०-४०० रुपये दराने विकला जात आहे. त्याचप्रमाणे मेथीची जुडी बाजारात ३० रुपये किलो दराने विकली जात असून या वाढत्या मागणीमुळे शेतकऱ्यांना अधिक नफा मिळू शकतो. हिवाळ्यात लोकप्रिय असलेल्या भाज्यांमध्ये शेवग्याच्या शेंगांचा दर बाजारात १३० रुपये प्रति किलोवर पोहोचला आहे.

या भाववाढीचा थेट लाभ शेतकऱ्यांना मिळू शकतो, यासाठी त्यांच्या उत्पन्नात मोठी वाढ होऊ शकते. दरम्यान, दिवाळीच्या सुटीनिमित्त अनेक लोक गावी जातात त्यामुळे शहरातील गर्दी कमी होते. याच कारणामुळे फळभाज्या आणि पालेभाज्यांची विक्री होत नाही त्यामुळे शेतकऱ्यांना मिळणारा दर कमी होतो. दिवाळीची सुटी संपल्यावर सगळे पुन्हा शहरात येतात आणि या वाढत्या गर्दीमुळे पुन्हा भाज्यांचे दर वाढले आहेत. दिवाळीमध्ये असलेल्या दरापेक्षा आता १०-२० रुपये किलोने दर वाढले असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले आहे.सफरचंदाचे दर आटोक्यात

सध्या बाजारात फळभाज्या आणि पालेभाज्यांची आवक होत असते. दरम्यान, फळबाजारामध्ये पेरूचे दर वाढले आहेत मात्र, देशी सफरचंदाचे दर आटोक्यात आहेत. धान्यबाजारामध्ये डाळीच्या दरात घसरण झाल्यामुळे ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. तसेच आता सर्व सणांनंतर आता फुलांच्याही दरात घसरण झाली आहे.

# वंचितांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी डॉ सोनकाटे यांना निवडून द्यावे - आंबेडकर



धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) - मराठा समाजाच्या राजकीय नेते मंडळींनी मराठ्यांची खानावळ चालू ठेवली आहे. त्यापैकी एक खानावळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे चालवीत असून तेथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपरे आहेत. तर दुसरी खनावळ राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार चालवीत असून तेथे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे उपरे आहेत. या खणावळीमध्ये साळी, माळी, कैकाडी, दलित, आदिवासी, धनगर, मुस्लिम वर्षानुवर्षे उभे राहिले. मात्र ते उपाशीच राहिले आहेत. मराठ्यांचे पाच उमेदवार निवडणुकीला उभे असले तर ते एका रात्रीत कोणाला चालवायचा हे ठरवितात. आता बहुजनांमध्ये देखील राजकीय शहाणपणा आला आहे. त्यामुळे वंचितांचे हक्क व आरक्षण अबाधित ठेवण्यासाठी तुळजापूर विधानसभेच्या उमेदवार डॉ स्नेहा सोनकाटे यांना कोणत्याही परिस्थितीत निवडून देऊन आमदार करावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी केले.

तुळजापूर येथे वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार डॉ स्नेहा सोनकाटे यांच्या प्रचारार्थ आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष बी.डी शिंदे, विकास बनसोडे, डॉ नितीन ढेपे, मिलिंद रोकडे, जीवन कदम उमेदवार डॉ स्नेहा सोनकाटे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना सुजात आंबेडकर म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाचे वर्गीकरण करण्याचा चुकीचा निर्णय दिला असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी भाजप व काँग्रेसची सरकारे पुढाकार घेत आहेत. मात्र वाढता विरोध व डोळ्यासमोर निवडणुका ठेवून त्याची अंमलबजावणी तूर्तास थांबवलेली आहे. क्रिमिलियर लागू केल्यास दलित व आदिवासी या समूहातील जातींचे वर्गीकरण करून त्यांच्यामध्ये भांडणे लावण्याचा डाव आहे. या समूहामध्ये भांडणे लागली की आरक्षणामध्ये घटना दत्त तरतूद केलेले हक्काचे आरक्षण काढून घेण्याचा भाजप व काँग्रेसचा डाव असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत आरक्षणाला हात लावू देणार नाही असा सज्जड दम त्यांनी दिला. कारण आरक्षणामुळे आज वंचित घटकातील अनेकांना आपली प्रगती करता आली व येत आहे. आरक्षण गेले तर त्याचा बहुजन समाजाला प्रचंड मोठा फटका बसणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला. त्यामुळे ओबीसी, धनगर, आदिवासी, दलित यांनी आपल्या पुढच्या पिढीसाठी हे आरक्षण वाचून ठेवायचे आहे असे आवाहन त्यांनी केले. तसेच मनोज जरांगे पाटील यांची चळवळ गरीब मराठ्यांना आरक्षण मिळावे यासाठी उभी केली. त्यांना वंचित बहुजन आघाडीने पाठिंबा दिला.

मात्र त्यांनी ओबीसी व कुणबी प्रवरगाच्या कोट्यातून आरक्षण देण्याची मागणी केल्यामुळे आम्ही मराठ्यांना व ओबीसींना आरक्षणाचे स्वतंत्र ताट असावे ही स्पष्ट भूमिका घेतल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे आजपर्यंतच्या निवडणुकीमध्ये मराठा समाजाचे ५-५ उमेदवार निवडणूक लढवीत असले तरी शेवटच्या एका रात्रीत कोणाला चालवायचे यावर एकमत व्हायचे. मात्र आता बहुजनांमध्ये देखील राजकीय शहाणपण आले असून या निवडणुकीत सर्व बहुजन समाज आपल्याच हक्कासाठी निवडणूक लढवीत असलेल्या वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी एकत्र आला असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे कोणीही थकू नका कमी पडू नका विरोधक अफवा पसरवतील त्या अफेवर विश्वास ठेवू नका. आपल्या उमेदवाराच्या काही चुका झाल्या असतील तर त्या माफ करून डॉ सोनकाटे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन आंबेडकर यांनी केल

# जनतेने पुन्हा आशिर्वाद देऊन निवडून द्यावे - आ राणाजगजितसिंह पाटील



धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) - मी सर्वसामान्य सह शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी सभागृहात आवाज उठवून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच मतदार संघातील प्रत्येक गावात विकास निधी आणून ती कामे मार्गी लावली आहेत. तर उर्वरित विकास कामे करण्यासाठी जनतेने मला पुन्हा आशीर्वाद देऊन निवडून द्यावे असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी ठिकठिकाणी आयोजित प्रचार सभेत मतदारांशी संवाद साधताना केले. तुळजापूर विधानसभेचे महायुतीचे उमेदवार आ राणाजगजितसिंह पाटील यांनी कसई व आरळी (बु) येथील प्रचार सभेत ते बोलत होते. पुढे बोलताना आ पाटील म्हणाले की, मतदारांचा उत्साह आणि वाढता पाठिंबा पाहता विजय आणखी सोपा दिसत आहे. परंतू आपण गाफील न राहता पुढचे काही दिवस कष्ट घ्यायचे आहेत.

आपल्या विकासाच्या मुद्याला प्रभावित होऊन इतर पक्षातील अनेकांनी भाजपात जाहीर प्रवेश केला व करीत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच गावच्या विकासा् विषयी जागरूक असणाऱ्या प्रत्येक नागरिकाला मागील पाच वर्षात जी कामे झालीत याचा अभिमान वाटतोय. आपल्या सर्वांच्या एकजुटीमुळे आणि मेहनतीमुळे गावचा चेहरामोहरा बदलत असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे ही निवडणूक प्रत्येकासाठी विकासाच्या नव्या संधी घेऊन येत आहे.

# स्वार्थासाठी शिवसेनेचा झेंडा उचलणाऱ्या आमदाराला जनतेनी घरी बसवावे - अजित पिंगळे



धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) - खामगाव,कौडगाव (बावी) - काही लोकांनी केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी शिवसेनेचा झेंडा उचलला आहे. परंतु,हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या व स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या विचारांवर आधारित विकासात्मक आणि धाडसी निर्णय घेण्याच्या कर्तव्यभावनेने कार्यरत असलेल्या खऱ्या शिवसैनिकाला निवडून देणे हीच -हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांना खरी श्रद्धांजली ठरेल.त्यासाठी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आणि त्यांच्या उद्दिष्टांना पुढे नेणारा मी एक निष्ठावान शिवसैनिक आहे.असे आवाहन महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांनी केले.

धाराशिव मतदारसंघातील खामगाव, कौडगाव (बावी) येथे दि.१२ नोव्हेंबर २०२४ मंगळवारी रोजी मतदारांशी महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांनी संवाद साधला.

सुरुवातीला गावातील हनुमंत मंदिर व श्रीराम मंदिर येथे अजित पिंगळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले.

पुढे अजित पिंगळे म्हणाले की,या निवडणुकीत शिवसेना महायुतीच्या माध्यमातून प्रामाणिकपणे जनतेची सेवा करण्याची संधी मला मिळावी यासाठी मला भरघोस मतदान करावे,ही माझी जनतेकडे नम्र विनंती आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात विकासाचे विविध प्रकल्प आणि योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी महायुती कटिबद्ध असून, या निवडणुकीत मतदारांनी योग्य निर्णय घेऊन खऱ्या शिवसैनिकाला निवडून द्यावे असे आवाहन करण्यात आले आहे.याप्रसंगी गावातील मतदार बांधव व महायुतीचे सर्व पदाधिकारी,कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## जाहीरनामा

**श्री.के.जी. चौधरी, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, लातूर यांच्या न्यायालयात**

कोर्टाचा शिक्का

**वारसा प्रमाणपत्र क्र.१८८८/२०२४**
**शांताबाई वि. निरंक**
**निशाणी क्रमांक:०६**

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत**

ज्यापेक्षा मयत सुभाष नागनाथ बनसोडे यांचा दिनांक ०८.१०.२०२४ रोजी शाम नगर, १२ नं, पार्टी ता.जि. लातूर येथे मृत्यु झाला. उपरोक्त प्रकरणात अर्जदार शांताबाई भ्र. सुभाष बनसोडे व इतर वारस १. ज्ञानेश्वर सुभाष बनसोडे, २. अजय सुभाष बनसोडे ३. अम्रपाली अमोल थोरे, ४. दिपाली धिरज कसबे यांनी सुभाष नागनाथ बनसोडे यांचे वारस असले बाबत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार यांनी उपरोक्त प्रकरणात मयत सुभाष नागनाथ बनसोडे यांच्या मृत्युपश्चात अर्जदार यांना मयताचे कायदेशिर वारस घोषीत करून तसेच वारसाचे प्रमाणपत्र सरकारी व निमसरकारी कार्यालयात अर्जदाराचे नाव नोंदणी करण्यासाठी व इतर कामासाठी त्यांच्या हक्कामध्ये वारसाचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज केला आहे. त्यापेक्षा उपरोक्त अर्जदार हे मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक महिण्याच्या आत या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात, या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदारास सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज तारीखः १२.११.२०२४
पुढील तारीखः १७.१२.२०२४

**व्ही.जी. गायकवाड**
**क.लिपीक**

**आदेशावरुन,**
**सहा.अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय**
**व.स्तर, लातूर**

## जाहीर प्रगटन

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, सोमनाथ नागनाथ सोरडे हे दि आदर्श सहकारी (भा.मा.) गृहनिर्माण संस्था म.लातूर या संस्थेचे नाममात्र सभासद आहेत. सदर संस्थेच्या शॉपिंग सेंटरमधील दुकान नं. ३९ हे त्यांचे नावावर वर्ग करण्यात आले होते. सदर दुकान शेखर शरणाप्पा कंटे यांच्या नावाने हस्तांतर करणेचा प्रस्ताव संस्थेकडे दि. ०८.११.२०२४ रोजी सादर करण्यात आला आहे. त्यामुळे सदर दुकान नं. ३९ च्या हस्तांतरणाबाबत कोणाचे काही आक्षेप अथवा उजर, तक्रार जसे की, गहाणखत, खरेदीखत, दानपत्र, बक्षिसपत्र, ठरावपत्र, वारसाहक्क, न्यायालयीन प्रकरण व त्यातील आदेश, महानगरपालिकेचे आरक्षण, इच्छापत्र, तारण इ. असल्यास सर्व संबंधीतांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यातारखेपासून ०७ दिवसाच्या आत दि आदर्श सहकारी (भा.मा.) गृहनिर्माण संस्था म.लातूर या संस्थेच्या कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात पुराव्यासह हरकत सादर करावी. याबाबत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर दुकान नं. ३९ हे निर्विवाद आहे असे समजून सदरील दुकान शेखर शरणाप्पा कंटे यांच्या नावावर वर्ग (हस्तांतर) करणेची योग्य ती कार्यवाही संस्थेकडून करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. याची कृपया संबंधीतांनी नोंद घ्यावी. दिनांक : १२.११.२०२४

**सचिव**
**दि आदर्श सहकारी (भा.मा.)**
**गृहनिर्माण संस्था म.लातूर**

## CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM SHAIKH AHMAD IMAMSAB TO AHEMAD IMAMSAB TAMBOLI HENCE FROTH THIS DECLERETION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE AHEMAD IMAMSAB TAMBOLI IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY HASBAND CHILDREN AND FAMILY

**OLD NAME :-**SHAIKH AHMAD IMAMSAB
**NEW NAME :-**AHEMAD IMAMSAB TAMBOLI
**ADDRESS :-**GALLI NO 6 ISLAM PURA LATUR
DT- LATUR, (M.S)413512

## CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM SHAIKH KAUSARBEE AHMAD TO KAUSARBI AHEMAD TAMBOLI HENCE FROTH THIS DECLERETION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE KAUSARBI AHEMAD TAMBOLI IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY HASBAND CHILDREN AND FAMILY

**OLD NAME**
SHAIKH KAUSARBEE AHMAD
**NEW NAME**
KAUSARBI AHEMAD TAMBOLI
**ADDRESS:** GALLI NO 6 ISLAM PURA LATUR
DT- LATUR, (M.S)413512


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69 / 98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26


महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

### निविदा सूचना

**कामाचे नाव :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या MCVC विभागातील वर्कशॉप च्या भिंती पाडुन हॉलमध्ये परिवर्तीत करणे. प्राचार्य महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांनी ही निवीदा बांधकाम कंत्राटदार व गुत्तेदार यांच्यासाठी काढलेली असुन, ज्यांना ही निवीदा भरावयाची आहे, अशा बांधकाम कंत्राटदार व गुत्तेदार यांनी महाविद्यालयात प्रत्यक्ष हॉलची पाहणी करुन नवीन प्लॅनप्रमाणे आम्ही केलेल्या इस्टीमेटप्रमाणे बांधकाम करण्यासाठी साहित्यासह लागणारे मटेरिअल व मजूरी रक्कमसह निवीदा भरावी.

**निवीदा भरण्याची अंतीम दिनांक: दि. १८/११/२०२४.**
**निवीदा भरण्याची अंतीम वेळ :** दुपारी ३ वाजेपर्यंत.

**प्राचार्य**
**महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,**
**लातूर**

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.उदगीर
नगरपरिषद, उदगीर जि.लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस - | ५.५० % |
| ४६ ते १८० दिवस | ७.५० % |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५० % |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५० % |
| ३६ महिने ते ६० महिने | १० % |

९ % आवर्त ठेव द.सा.द.शे. ०.५० % अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट,७८ महिने, वैधानिक कर्ज व इतर कर्ज १६ % सोने तारण कर्ज १४ % केअर हाउस कर्ज १६ %, वरिल सर्व ठेवीवर निमय व अटी लागू.





यशवंत
बुधवार दि. १३ नोव्हेंबर २०२४
उदगीर
पान ८
कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com



बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ५.००% | ५.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | १०.००% | १०.५०% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.५०% | ११.००% |

**मासिक प्राप्ती योजना :-** आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८६७/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३६ महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (१०.५०%)
**दाम दुप्पट योजना :-** रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)
**आवर्तक ठेव योजना (RD) :-** (०१/१०/२०२३ पासुन लागू)

| अ.क्र | मुदत/कालावधी | व्याजदर |
|---|---|---|
| १ | १३ ते २४ महिने | ९.२५% |
| २ | २५ ते ३६ महिने | ९.५०% |
| ३ | ३७ ते ६० महिने | १०.२५% |
| ४ | ६० महिने ते पुढे | ९.००% |


# विकासाचा डोंगर उभारणाऱ्या ना.संजय बनसोडे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा : माजी केंद्रीय मंत्री भगवंत खुब्बा



**उदगीर (प्रतिनिधी)** विकासाचा सूक्ष्म आराखडा तयार करून पाच वर्षात उदगीर मतदार संघाला विकासाच्या दिशेने घेवुन जाण्याचे काम राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी केले आहे. विकासाचा हा डोंगर उभा करून या भागातील सामान्य जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी झटणा□्या ना. बनसोडे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन माजी केंद्रीय राज्यमंत्री भगवंत खुबा यांनी केले.

उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार ना. संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ येथील उदगीर शहरातील रघुकुल मंगल कार्यालयात माजी केंद्रीय राज्यमंत्री भगवंत खुब्बा यांच्या प्रमुख उपस्थितीत स्नेह सभा आयोजित करण्यात आली होती.
यावेळी ते बोलत होते.

यावेळी भाजपाचे निवडणूक प्रभारी हरीश कोटवाले, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस ॲड. व्यंकट बेद्रे, माजी उपसभापती रामराव बिरादार,प्रदेश सरचिटणीस समीर शेख, ॲड. बस्वराज पाटील कौळखेडकर, वीरशैव समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापुरे, भाजपाचे तालुकाध्यक्ष शिवशंकर धुप्पे, बस्वराज रोडगे, सुधीर भोसले, उत्तरा कलबुर्गे, श्रध्दा जगताप,
राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियॉं, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे, बिरादार, महाराष्ट्र बसव परिषदेचे माजी जिल्हाध्यक्ष कुणाल बागबंदे, यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना खुबा म्हणाले की, उदगीर मतदार संघात ना. संजय बनसोडे हे मंत्री झाल्यापासून मोठा बदल झाल्याचे पहावयास मिळत आहे. या मतदारसंघाचा सर्वांगीण विकास हाच ध्यास घेऊन निघालेले ना. बनसोडे यांनी मागच्या पाच वर्षात
मतदार संघातील शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक उन्नती व्हावी म्हणून कोल्हापुरी बंधारे व तिरू नदीवर बॅरेजची उभारणी करून खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवून आणली आहे. शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून महायुती सरकारने अल्प दरामध्ये पिक विमा शेतकऱ्यांची वीज बिल यासह विविध कल्याणकारी योजना राबवले आहेत.

ना.बनसोडे यांनी विविध प्रशासकीय इमारतीसह रस्ते, वीज, पाणी आणि आरोग्याचे प्रश्न सोडवले असुन सर्व जाती धर्मातील समाज घटकांना न्याय दिला आहे. लिंगायत समाजाला वीरशैव लिंगायत भवन, चौकी मठाला निधी, श्री रेणुकाचार्य संस्कार भवनाला निधी उपलब्ध करुन दिला. श्री हावगीस्वामी मठाचा विकास केला. जातीधर्माच्या पलीकडे जाऊन विकास करणारे हे नेतृत्व असून अशा नेतृत्वाला जपण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे. येणाऱ्या निवडणुकीत विरोधकांकडून आपल्या समाजाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

त्याला बळी न पडता सर्वांनी विकासासाठी एकदिलाने ना.संजय बनसोडे यांच्या पाठीशी उभे रहावे असे आवाहन यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री भगवंत खुब्बा यांनी केले.
यावेळी महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सैनिकी विद्यालयात कै. मलशेट्टीअप्पा पाटील नागराळकर यांची जयंती साजरी



**देवणी (प्रतिनिधी)** श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयात उदगीर पंचक्रोशीतील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व असलेले कै. मलशेट्टीअप्पा पाटील नागराळकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात विचारमंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य वसंत कुलकर्णी तर प्रमुख पाहुणे म्हणून योगगुरु रामचंद्र गरड, अरविंद अकनगिरे, झेटिंग कांबळे, मैनोद्दीन सय्यद, संगणक निदेशक विभाग प्रमुख सुनील महिंद्रकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात कै. मलशेट्टीअप्पा पाटील नागराळकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करुन करण्यात आली.

अध्यक्षिय समारोपात प्राचार्य वसंत कुलकर्णी म्हणाले, उदगीर पंचायत समितीचे पहिले सभापती, कृषी उत्पन्न बाजार समितीचे पहिले सभापती, लोकल बोर्डाचे सदस्य, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी उदगीरचे माजी अध्यक्ष म्हणून मलशेट्टीअप्पा पाटील नागराळकर यांची ओळख आहे. मलशेट्टीअप्पा पाटील नागराळकर यांनी प्रत्येक पदावर कार्य करताना आपल्या कार्यकर्तृत्वाचा अमिट ठसा उमटविला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे योगगुरु रामचंद्र गरड यांनी कै. मलशेट्टीअप्पा पाटील नागराळकर यांना जयंती निमित्त अभिवादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील महिंद्रकर यांनी केले तर आभार झेटिंग कांबळे यांनी मानले.

# कुमठा खुर्द येथे सोयाबीन ऑनलाईन नोंदणी व खरेदी केंद्राचा शुभारंभ

**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर तालुक्यातील कुमठा खुर्द येथे नाफफ्रेड ,महा किसान संघ कृषी प्रोड्यूसर कंपनी आणि हेल्दी अँड हॅपी ॲग्रो फफार्मर प्रोड्यूसर कंपनी कुमठा खुर्द यांच्या संयुक्त विद्यमानाने शासकीय हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. १३ नोव्हेंबर २०२४ पासून सोयाबीन खरेदी सुरुवात होत आहे. सोयाबीन साठी ४८९२ रुपये दर शासनाने निश्चित केलेला आहे, त्यासाठी शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी करणे गरजेचे आहे. १५ नोव्हेंबर ही नोंदणीसाठी शेवटची दिनांक आहे .शेतकऱ्यांनी सोयाबीन खरेदी पूर्वी सोयाबीनची आर्द्रता तपासणी करणे गरजेचे आहे. सोयाबीन साठी आर्द्रता १२टक्के, माती व इतर घटक के २ टक्के आणि खराब प्रतीचे सोयाबीन ३ टक्के आशा एफ ए क्यू प्रतीचे सोयाबीन केंद्रावर स्वीकारले जाईल, म्हणून शेतकऱ्यांनी लवकरात लवकर नोंदणी करून घ्यावी असे आवाहन केंद्र संचालक मअशोक केंद्रे व सुनील केंद्रेम यांनी केले आहे सोयाबीन नोंदणीसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे १. इ पीक पाहणी सातबारा सोयाबीन नोंदी सह २.बँकेचे पासबुक झेरॉक्स ३आधार कार्ड झेरॉक्स सोयाबीन खरेदी पूर्वी आर्द्रता तपासणी करणे आवश्यक आहे असे आवाहन केंद्र संचालकांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी उदगीर मतदारसंघातील कामाजाचा आढावा



**उदगीर (प्रतिनिधी)** जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांची उदगीर येथे निवडणूक कामकाजाविषयी दिली सर्व विभागाला भेट उदगीर २३७ अजा विधानसभा मतदारसंघ २०२४ अंतर्गत आज रोजी २३७ (अ जा) उदगीर विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्राची मतदान यंत्र हे क्षेत्रीय अधिकारी व मास्टर टेनर यांच्यामार्फत सीलबंद करण्यात आले तसेच माननीय जिल्हाधिकारी यांनी ईव्हीएम स्ट्राँग रूमला भेट दिली व प्रायोगिक तत्त्वावर सील झालेल्या मशीन त्यांच्यामार्फत तपासणी करण्यात आली व १००० माप पोल प्रायोगिक तत्त्वावर घेण्यात आलेल्या कक्षाशी भेट दिली व सर्व क्षेत्रीय अधिकारी निवडणूक काम चा कामकाजाविषयी असलेल्या सर्व यंत्रणांना सूक्ष्म सूचना व काम काज यशस्वीरित्या पार पाडण्याच्या सूचनाही सर्वांना दिल्या सोबत उपजिल्हाधिकारी प्रियंका अहिरे जिल्हा पुरवठा अधिकारी लातूर ,अहिल्या गाठाळ उपजिल्हाधिकारी उदगीर मधील सर्व निवडणूक विषयी कामकाजाची उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत शिंदे यांनीही जिल्हाधिकारी यांना उदगीर विधानसभा२३७( अ जा) यशस्वीरित्या पार पडत असलेल्या काम काजाविषयी माहिती दिली यासोबत उदगीर चे तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राम बोरगावकर जळकोट चे तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राजेश लांडगे ही उपस्थित होते

# राजीव गांधी तंत्रनिकेतन येथे एमआरएफ कंपनीतर्फे कॅम्पस ड्राइव्ह संपन्न



**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर येथील गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ, कौळखेड व्दारा संचलित राजीव गांधी तंत्रनिकेतन, उदगीर येथे दि. १२.११.२०२४ रोजी भारतातील टायर निर्मितीत अग्रगण्य असलेल्या एम आर एफ चठऋ या कंपनीच्या अंकेनपल्ली सदाशिवपेठ हैद्राबाद येथील कंपनीतर्फे थेट कॅम्प्पस ड्राइव्ह आयोजित करण्यात आला होता. सदर कॅम्पस ड्राईव्हसाठी एकूण ८४ विद्यार्थी मुलाखतीस सामोरे गेले. सदर मुलाखती घेण्यासाठी चठऋ कंपनीतील कठ विभागातील प्रमुख श्री. नरेंद्र भाले, प्रोडक्शन विभागाचे प्रमुख श्री. साबु कुरूविल्ला व त्यांची टीम उपस्थित होती. यावेळी सर्व चठऋ कंपनीच्या टिमचा गुणाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या राजीव गांधी तंत्रनिकेतन उदगीरचे प्राचार्य पी.डी. जाधव व सर्व शिक्षक कर्मचारी यांच्या तर्फे स्वागत करण्यात आले. सुरूवातीला कंपनीच्या कठ विभागातील प्रमुख श्री. नरेंद्र भाल सरांनी विद्यार्थ्यांना कंपनी बदल माहिती देत मुलाखातीची प्रक्रिया समजावून सांगीतली व त्यानंतर प्रोडक्शन विभागाचे श्री. कुरूविल्ला सर यांनी कंपनीतील कामाबदल सविस्तर माहिती सांगीतली. संस्थेचे अध्यक्ष श्री. बापुसाहेब राठोड व संस्थेचे सचिव श्री. अमित राठोड यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले. यामध्ये थेट मुलाखातीत तंत्रनिकेतन मधील ११ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली व आय. टी. आय मधील ३० असे एकूण ४१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यासाठी तंत्रनिकेतनचे प्रशिक्षण व नियुक्ती आधिकारी श्री. सोलापूरे एस.बी., मेकॅनिकल विभागाचे विभाग प्रमुख श्री. इंद्राळे आर. आर. व सर्व विभागप्रमुख यांनी आतोनात प्रयत्न करून हा ड्राइव्ह यशस्वीरित्या पार पाडला.
तंत्रशिक्षण उपलब्ध करून देऊन चालणार नसून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने अशा प्रकारचे कॅम्पस ड्राईव्ह वारंवार राजीव गांधी तंत्रनिकेतन, उदगीर येथे आयोजित करण्यात येतील असे प्राचार्य जाधव यांनी सांगितले.
तंत्रनिकेतन व आयटीआय मधील नोकरी मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब राठोड, सचिव अमित राठोड, प्राचार्य जाधव पी.डी., सर्व विभाग प्रमुख , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.


## घर भाडयाने देणे आहे

राहते घर व्यवसायासाठी भाड्याने देणे आहे नाईक चौक निडेबन रोड, उदगीर येथील राहते घर ६०X४५ चे सर्व सोईनी युक्त बँक, हॉस्पिटल, व्यापार, कोचिंग क्लासेस व्यवसायासाठी भाड्याने देणे आहे.
संपर्क
रतिकांत शिवकुमार अंबेसंगे
९४२१०७००००
९०२१०७००००

## घर विकणे आहे

शिवाजी महाविद्यालय /विद्यावर्धिनी हायस्कुलच्या पाठीमागे नई अबादी उदगीर येथील बलराम रामचंद्र येरमे यांचे घर ज्याची साईज ८०x८० दोन मजली घर ज्यात सर्व सोईनी युक्त असलेले ३१ रुम विकणे आहे.
संपर्क : ९८२३६३२३००, ९४२३३४७७५०, ९०९६४२४०४२